सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४३ | पाने : ४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
















सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पशुगणनेस सुरुवात ; अचूक माहिती देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ नोव्हेंबर**

केंद्र पुरस्कृत पंचवार्षिक २१ वी पशुगणना २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत होत आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत नेमलेले प्रगणक घरी आल्यानंतर पशुपालकांनी त्यांच्याकडील पशुधनांची अचूक माहिती प्रगणकांना द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने आणि पशुसंवर्धन विभागामार्फत छत्रपती संभाजी नगरचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त गणेश देशपांडे यांनी केले आहे.

या कालावधीत पशुसंवर्धन विभागामार्फत नेमलेले प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत. या पशुधनाच्या माहितीमध्ये कुंटुबामध्ये असलेल्या गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळी व मेंढी, वराह, घोडे व गाढवे, कुक्कुट पक्षी इत्यादीच्या संख्येची नोंद मोबाईल पद्वारे करण्यात येणार आहे. या पशुगणनेमध्ये पशुधन संख्येसोबतच पशुधनाच्या प्रजाती, लिंग, वय, इत्यादी बाबीची नोंद करण्यात येणार आहे. या पूर्वीची पशुगणनाही टॅबद्वारे करण्यात आलेली होती. तथापि आताची मोबाईल वरील पद्वारे करण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र पची निर्मिती केलेली आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत असलेल्या पशुगणनेमुळे पशुपालकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे (पशुरोग प्रतिबंधक लसीकरण, वैरण बियाणे, पशुखाद्य, पशु औषधी, मुरघास, खनिज मिश्रण, पशुधन विमा इत्यादी) सुलभ होणार आहे. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती, वन्यजीवाकडून मृत्यू, गोशाळेतील पशुधनास अनुदान, पशु सांसर्गिक रोग प्रादुभावामुळे मृत्यू, विजेच्या संपर्कामुळे मृत्यू इत्यादी कारणाने पशुपालकांना मिळणारी नुकसान भरपाई मिळणेही सोईचे व सुलभ होणार आहे.

बीड जिल्ह्यात ११ तालुक्यासाठी २२६ प्रगणक, त्यांच्यावर पर्यवेक्षण करण्यासाठी ५६ पर्यवेक्षक नेमलेले आहेत. संपूर्ण जिल्ह्यावर सह नियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा नोडल अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्यावर आहे.

जिल्ह्यामध्ये असणाऱ्या गोशाळा मध्ये जनावरांची नोंदणी होणार आहे. पशुधन क्षेत्रांमध्ये वापरले जाणारे उपकरणे जसे की अंडी उबवणूक यंत्र, दूध काढण्याचे यंत्र, चारा कापणी यंत्र, गवत कापणी व बांधणी यंत्र ,शेण गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावण्याचे उपकरण याची सुद्धा माहिती संकलित करण्यात येणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व शहरी भागातील शेतकरी ,पशुपालक ,गोशाळा ,पोल्ट्री फार्म यांनी सदरील पशुगणनेसाठी माहिती संकलित करण्यासाठी येणाऱ्या प्रगणक यांना संपूर्ण व अचूक माहिती देण्यात यावी. सदरील माहिती ही गोपनीय राहणार आहे. पशुगणना ही ऑनलाईन अँपद्वारे होणार आहे. त्यामुळे प्रत्येक जनावराच्या कानात टॅग असणे गरजेचे आहे. त्या टॅग नंबर प्रमाणे पशुमालकासह माहिती ऑनलाईन अपलोड होणार आहे. या पशुगणनेसाठी शेतकरी, पशुपालक, शेळीपालन करणारे, पोल्ट्री फार्म, गोशाळा यांनी सहकार्य करावे. राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले आहे.

# छत्रपती साखर कारखान्याच्या गळीत हंगामास सुरुवात

**इतर कारखान्यापेक्षा अधिकचा भाव देऊ – व्हा. चेअरमन मोहनराव जगताप**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ नोव्हेंबर**



माजलगांव तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा २०२४-२५ चा अकरावा गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप व व्हा.चेअरमन मोहन जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते पार पडला.

तसेच छत्रपती साखर कारखाना इतर कारखान्यापेक्षा अधिकचा ऊसाला भाव देणारा आहे तसेच मागील वर्षी पाऊस कमी प्रमानात असल्याने ऊसाची लागण कमी आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती सहकारी साखर कारखान्याकडे गळापासाठी आणावा असे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन मा.आ.बाजीराव (भाऊ ) जगताप यांनी केले.

तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहन जगताप शेतकऱ्यांना बोलताना म्हणाले की, मागील दहा हंगामात कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १२५० मे.टन होती. या हंगामात कारखान्याची क्षमता वाढली असून आता ५००० मे.टन प्रतिदिन झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाची कोंडी दूर झाली आहे. तसेच गेल्या दहा हंगामात छत्रपती कारखान्याने इतर कारखान्यापेक्षा जास्त ऊसाला भाव दिला आहे तीच परंपरा या गाळप हंगामात कायम राहील असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नारायण अण्णा डक, भाई गंगाभीषण थावरे, भाई नारायण गोले, नारायण होके,विनायक मुळी, श्रीहरी काळे, महादेव जमाले, अरुनराव इंगळे, प्रशांत मोरे, प्रकाश जेधे, विश्वंभर थावरे, कचरू खळगे, शकीलभाई खुरेशी, कॉम्रेड दत्ता डाके,प्रभाकर नरवडे, युवराज लगड, संतोष यादव, रामराजे रांजवन यांचे सह कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी,सभासद , कारखान्याचे कर्मचारी,ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार,पत्रकार , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातून एक लाख ४० हजार इतक्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी आज पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे साहेब, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ साहेब यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी भेट घेऊन अभिनंदन केले तसेच आभार व्यक्त केले.

# बीडमध्ये होणार घर घर संविधान कार्यक्रम साजरा

संविधान अमृत महोत्सव २०१४ – २५ , घर घर संविधान हा कार्यक्रम २६ नोव्हेंबर पासून साजरा करण्यात येणार असल्याचे जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष तथा बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी नमूद केले . तसेच सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस्तव सर्व विभागांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत , असे सांगितले .

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू केली . नागरिकांना सामाजिक , आर्थिक , विचार , अभिव्यक्ती , विश्वास , श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता, एकात्मता , बंधुता या मूल्यांचा यात विचार केलेला आहे . भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४ – २५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे .

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता वाढविणे , घटनात्मक अधिकार व कर्तव्याबद्दल सर्व नागरिकांमध्ये जागरूकता वाढविणे हा या मागचा उद्देश आहे . संविधानातील मूलभूत हक्क , कर्तव्य आणि विविध तरतुदींचे शिक्षण देणे , विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता व न्यायाची भावना रुजविणे , विद्यार्थ्यांमध्ये विविधतेतून एकता आणि समता या संकल्पनांचा विकास करणे , सर्वांचा सक्रिय सहभाग वाढविणे , राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे इत्यादी उद्देश यातून साध्य होतील , अशी अपेक्षा आहे . या संदर्भातील शासन निर्णय दिनांक १० ऑक्टोबर २०२४ मध्ये नमूद केल्यानुसार शाळा , महाविद्यालये , वस्तीगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावण्यात येणार आहे .

यापूर्वी शासनाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याबाबत २२ नोव्हेंबर २०१६ रोजी शासननिर्णय जारी केला आहे . या शासन निर्णयानुसार दरवर्षी संविधान दिनी विविध कार्यक्रम घेण्यात येत होते . त्याला जोडूनच नवीन शासन निर्णयाची अंमलबजावणी या वर्षापासून होणार आहे .

यनिमित्ताने आगामी वर्षात शालेय परिपाठात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात येणार आहे . विद्यार्थ्यांना संविधानाच्या प्रती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत . संविधानावर आधारित व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार आहे . विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील हक्क आणि कर्तव्य यावर मार्गदर्शन केले जाणार आहे . पथनाट्य , फलक , पोस्टर , प्रदर्शन , निबंधलेखन , भाषण , वादविवाद , चित्रकला स्पर्धा यांचे सादरीकरण करण्याबाबत सूचना आहेत . ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांमध्ये प्रस्ताविकेचे वाचन करावे , विधान परिषद , विधानसभा यांच्या सत्रांची सुरुवात प्रास्ताविकेच्या वाचनाने करावी यासंदर्भात सुचना या शासननिर्णयात आहेत . शासन स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव हे सदस्य सचिव असणार आहेत . तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी हे अध्यक्ष तर निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असणार आहेत . जिल्हास्तरीय समितीने संविधान मंचाच्या कार्याची वार्षिक योजना तयार करावयाची आहे . संविधान दिनी म्हणजेच २६ नोव्हेंबर , प्रजासत्ताक दिनी म्हणजेच २६ जानेवारी यासारख्या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित करण्याबाबत शासन निर्णयात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत .

संविधान किंवा घटनेचा इतिहास

संविधान सभेचे पहिले अधिवेशन : १३ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेने भारतीय राज्यघटना तयार करण्याचे कार्य औपचारिकपणे सुरू केले . जवाहरलाल नेहरूंनी उद्दिष्ट ठराव मांडला , ज्याचा उद्देश भारताला स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक म्हणून घोषित करणे आणि त्याचे भविष्य नियंत्रित करण्यासाठी राज्यघटना तयार करणे हे होते . या ठरावाने संविधान सभेच्या कार्याचे मार्गदर्शन करण्यासाठी सामान्य तत्त्वे स्थापित केली गेली . २२ जानेवारी १९४७ रोजी संविधान सभेने ठराव मंजूर केला . ४ नोव्हेंबर १९४८ रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचा मसुदा संविधान सभेला सादर केला होता . संविधानाचा मसुदा विधानसभेत चर्चेसाठी खुला करण्यात आला .

भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी आणि अवलंब

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी , संविधानाचे तिसरे वाचन संपले आणि संविधान सभेत मागील टप्प्यात डॉ आंबेडकरांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या बाजूने मतदान झाले . संविधानाच्या अंतिम आवृत्तीवर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या सदस्यांनी स्वाक्षरी केली आणि २६ जानेवारी १९५० रोजी घटना लागू झाली .घर घर संविधान या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय नागरिकात , संविधान / घटना , प्रास्ताविक यातील उच्च तत्वे , मूल्ये याबद्दल माहिती व्हावी व भारताच्या जाज्वल्य इतिहास व संस्कृती भारतीयात रुजावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे , असे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या निमित्ताने नमूद केले .

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ नोव्हेंबर**

दि.२६ नोव्हेंबर रोजी स्वा . सावरकर प्राथमिक विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर, विभाग प्रमुख श्री.सचिन सानप सर, वक्ते म्हणून शाळेतील सहशिक्षिका श्रीमती पल्लवी खंबायते व सहशिक्षक श्री.योगेश दातीर उपस्थित होते.



श्रीमती पल्लवी खंबायते यांनी संविधान दिनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली तसेच श्री.योगेश दातीर यांनी संविधान कशाप्रकारे तयार करण्यात आले त्याचा वापर कसा केला जातो हे विद्यार्थ्यांना सांगितले तसेच तीनही भाषेत संविधान वाचन केले. यावेळी शेवटी अध्यक्ष समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर यांनी संविधान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती.रूपाली गुळवेलकर यांनी केले .

# भारतीय संविधान हे खऱ्या अर्थाने लोकशाहीची रुजवणुक करणारे संविधान आहे–मातेकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ नोव्हेंबर**

भारतात एकता,एकात्मता आणि बंधुता कायम राहावी.भारतातील लोकशाहीचा आदर्श सर्व जगाने घ्यावा यासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमातून भारतीय संविधानाची निर्मिती केली.त्यांनी निर्माण केलेले 'भारतीय संविधान' हे खऱ्या अर्थाने लोकशाहीची रुजवणूक करणारे संविधान आहे असे विचार जेष्ठ शिक्षक तथा इतिहास अभ्यासक ज्ञानेश मातेकर यांनी मांडले.



दि.२६ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात संपन्न झालेल्या 'संविधान दिन' कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले.तसेच संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक मातेकर यांनी संविधानाची जडणघडण याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.तसेच बाबासाहेबांनी भारतीय संस्कृती,भाषा,प्रांत,समाज,शिक्षण इ बाबींचा सखोल विचार करून संविधान निर्माण करण्यासाठी विविध देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला आणि खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही नांदावी अशी राज्यघटना निर्माण केली असे मत शेवटी त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व विद्यार्थ्यांनी संविधान ग्रंथाचे अवलोकन आणि वाचन केले.तसेच याप्रसंगी मुंबई येथे दि.२६ नोव्हेंबर २००८ रोजी झलेल्या आतंकवादी हल्ल्यातील शाहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नितीन चौधरी यांनी केले. सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे शानदार उदघाटन

**विचार आणि आचार संकुचित होणाऱ्या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज–तुषार गांधी यांचे मत**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ नोव्हेंबर**

विचार आणि आचार संकुचित होणा–या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज आहे असे मत गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांनी व्यक्त केले.

येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उदघाटक म्हणून तुषार गांधी बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्रख्यात सिनेअभिनेते तथा चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने होते तर व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडु लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना तुषार गांधी पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या सारखी माणसं होवून गेली का नाही अशी शंका निर्माण होणाऱ्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी अशा तीन दिवसीय समारोहाचे आयोजन करण्यात येते ही खुप समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत खुप महत्वाचा वाटा आहे. महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा त्यांनी दिला. भारत चीन घ्या युद्धकाळात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा ही त्यांनी उल.लेख केला.

आजच्या परिस्थितीत संपूर्ण देशभर संविधान विरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम किमी जण जाणीवपूर्वक करीत आहेत अशा परिस्थितीत याविरुद्ध सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहन तुषार गांधी यांनी केले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रख्यात सिने अभिनेता दिग्दर्शक किरण माने यांनी आपल्या भाषणात किरण माने यशवंतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी मला उपस्थित राहता आले हे माझं भाग्य. यशवंतराव चव्हाण हे गोरगरीब, शोषीत दलीत यांच्या उध्दारासाठी झटणारे नेते होते. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी देवराष्ट्र या गावात असपृशांसाठी शाळा महर्षी वि. रा. शिंदे यांच्या हस्ते सुरू केली. यशवंतराव चव्हाण हे समाजकारणातुन राजकारणात



आले. आमदार झाले, मंत्री झाले, मुख्यमंत्री, उपपंतप्रधान झाले. सत्तेचा कैफ आपल्या डोक्यात न जावू देणारा हा नेता होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा असला तरी निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आपला काहीही सहभाग नाही हे ठासून सांगणारा हा नेता होता. यशवंतराव चव्हाण हे तरल संवेदनशीलता, समाजभान, गरीबांची जाण असलेला नेता होता. अशा या थोर माणसांच्या विचारांचा जागर होणार महाराष्ट्रातील अंबाजोगाई हे एकमेव गाव असल्याचा आपल्या अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी दीपप्रज्वलन व यशवंतराव चव्हाण, व स्व.भगवानराव लोमटे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ३९ वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका–यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला–संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंराव चव्हाण स्मृती समारोहात देण्यात येते. या पुर्वी आयोजित करण्यात आलेल्या स्मृती समारोहाच्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील अनेक मान्यवर विचारवंतांनी आपली हजरी लावली असून आज या समारोहाचे उदघाटन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांच्या हस्ते व प्रख्यात सिनेअभिनेते तथा अनेक चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने यांच्या हस्ते होत आहे याचा आपणास मनस्वी आनंद होतो आहे असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सतीष लोमटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रा. मेघराज पवळे यांनी मानले.यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. मेघराज पवळे यांनी मानले.

उदघाटन समारंभानंतर रात्री ठाणे येथील ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रज्ञा दया पवार यांच्या अध्यक्षतेखालील रंगदार कवी संमेलन संपन्न झाले.या कवी संमेलनाचे बहारदार सूत्र संचलन अकोला येथील सुप्रसिद्ध कवी गझलकार गोपाळ मापारी यांनी केले तर या कवी संमेलनात डॉ. वृषाली किन्हाळकर (नांदेड), प्रा. सिसिलिया कार्व्हालो (वसई), संगीता बर्वे (पुणे), संजय चौधरी (नाशिक), बालाजी मदन इंगळे (उमरगा), रमजान मुल्ला (सांगली), जयंत चावरे (यवतमाळ), पूजा भडांगे (बेळगाव), सुनिती लिमये (पुणे), बालाजी सुतार (वर्धा–अंबाजोगाई), नारायण पुरी (छत्रपती संभाजीनगर), नितीन वरणकार शेगाव आणि संजय आढाव परळी यांचा सहभाग होता.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४३ | पाने : ४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाविकास आघाडीचा आता ईव्हीएम विरोधात एल्गार!

## व्हीव्हीपॅट मोजणीण्याच्या पवार, ठाकरेंच्या उमेदवारांना सूचना

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई दि २६ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत नामुष्कीजन्य पराभवाला सामोरे जावे लागलेल्या विकास आघाडीने आता अपयशाचे सर्व खापर ईव्हीएम मशीन वर फोडून त्याविरोधात राज्य व देश पातळीवर आंदोलन उभा करण्याचा निर्धार केला आहे. ईव्हीएम मशीन ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे यासाठी एल्गार करण्याचा सुतोवा आघाडीच्या नेत्यांनी मंगळवारी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांची आज स्वतंत्र बैठक झाल्या .त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्लीत राहुल गांधी व राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेतल्यानंतर ईव्हीएम विरोधात जनआंदोलन उभारणार असल्याचे सांगितले.तसेच

विधानसभेतील आक्षेपार्ह निकाल व मतदानातील तफावतीबाबत व्हीव्हीपॅट मोजणीसाठी संबंधित निवडणूक अधिकाऱ्याकडे मागणी करा, अशा सूचना शरद पवार व उद्धव ठाकरे यांनी आपापल्या उमेदवार व नेत्यांना केल्या. व्हीव्हीपॅट मोजणीसाठी २८ नोव्हेंबर पर्यंत मागणी करण्याची मुदत आहे.५ महिन्यांपूर्वी झालेल्या

लोकसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळवलेल्या 'मविआ'ला विधानसभा निवडणुकीत मात्र दारुण पराभव पत्करावा लागला सत्ताधारी महायुतीने ऐतिहासिक विजय नोंदवीत तब्बल २३२ जागा पटकावल्या तर मविआ ४८ जागावर समाधान मानावे लागले आहे.त्यामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या महाविकास आघाडीतील घटक पक्ष आपापल्या पक्षाच्या प्रमुख नेते

त्यामुळे ही कार्यवाही तातडीने

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या पराभूत व विजय आमदारांची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मध्ये बैठक झाली . यावेळी त्यांनी उमेदवारांची मते जाणून घेतली पराभवाचे कारणे काय काय असू शकतात याबाबत प्रत्येकाचे विचारले असता सर्वच उमेदवारांनी ईव्हीएम मशीन वर संशय व्यक्त केला मतदारसंघात पोषक वातावरण असतानाही मशीनमधून अनपेक्षित निकाल बाहेर आला असल्याचे त्यांचे मत होते. त्यावर पवार यांनी

केवळ आरोप करण्यापेक्षा जे आक्षेप आहेत किंवा निवडणूक प्रक्रियेत ज्या चुकीच्या बाबी घडल्या ,ते सर्व ठोस पुरावे गोळा करण्याच्या उमेदवारांना सूचना केल्या. जिथे ईव्हीएम आणि मतमोजणीमध्ये गोंधळ झाला आहे, त्या ठिकाणी सर्व पराभूत उमेदवारांना व्हीव्हीपॅट मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाला अर्ज करण्याच्या सूचना केल्या आहेत. किमान पाच टक्के तरी व्हीव्हीपॅट मतांची तपासणी करावी, असे सांगितले .

दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचीही विजयी २० आमदारांसह पराभूत उमेदवारांची मातोश्रीवर बैठक झाली. उद्धव यांनी चर्चा त्यांच्याबरोबर चर्चा करून पराभवाची कारणे जाणून घेतली. ईव्हीएम विरोधात मोठं आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला.या संदर्भात मविआची एकत्रित बैठक घेऊन आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

### ईव्हीएमच्या आक्षेपाबद्दल वकीलांची टीम : आव्हाड

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने ईव्हीएम विरोधात आक्रमक भूमिका घेण्याचे ठरवले असून जनआंदोलनाबरोबरच कायदेशीर लढाई लढली जाणार आहे. त्यासाठी उमेदवारांनी केलेल्या तक्रारी संदर्भात एक वकिलांची टीम करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यपातळीवर एक आणि केंद्रीय पातळीवर लढा दिला जाईल, असे शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.**

# २६/११ तील हुतात्म्यांना राज्यपालांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे अभिवादन

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२६ नोव्हेंबर : २६/११ च्या मुंबईवरील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांना राज्य पोलीस दलातर्फे आयोजित १६ व्या हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केले.मुंबई पोलीस मुख्यालयातील पोलीस स्मारक येथे हौतात्म्य प्राप्त झालेल्या पोलीस अधिकारी व जवानांना पुष्पचक्र वाहिले.

भावपूर्ण वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात पोलीस बँड पथकाने 'सलामी शस्त्र' तसेच 'बिगुलर्स लास्ट पोस्ट' वाजविले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी हुतात्म्यांना सलामी



देत अभिवादन केले.

त्यानंतर राज्यपालांनी हुतात्मा पोलीस कुटुंबातील सदस्यांची तसेच उपस्थित आजी व माजी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी

मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, उपनगर जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, वरिष्ठ अधिकारी डॉ. इकबाल सिंह चहल, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनीही अभिवादन केले.

# एकनाथ शिंदे बनले काळजीवाहू मुख्यमंत्री!!

## राज्यपालांकडे राजीनामा सादर



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२६ नोव्हेंबर : १४ व्या विधानसभेचा कालावधी संपुष्टात आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी राजभवनात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपल्या पदाचा व मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला.त्यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कार्यभार सांभाळण्यास सांगितले. चौदाव्या विधानसभेचा कालावधी आज संपुष्टात आला त्यामुळे हे सभागृह बरखास्त झाले आहे. निवडून आलेल्या सदस्यांकरवी नवीन सभागृह अस्तित्वात येईल. नव्या सरकारचा शपथविधी होईपर्यंत शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.यावेळी मुंबईचे पालक मंत्री दीपक केसरकर, दादाजी भुसे व अन्य उपस्थित होते.

# मुख्यमंत्रीपदावरून शिंदे - फडणवीसांच्यात दुरावा ?

## भाजपा श्रेष्ठीकडून सामोपचाराचे प्रयत्न

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई : २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा व शिवसेनेत मुख्यमंत्री पदावरून जे नाराजी नाट्य रंगले होते, तसाच काहीसा प्रकार आता महायुतीमध्ये भाजपा व एकनाथ शिंदे यांच्यात होत असल्याचे दिसून येत आहे. त्यावेळी सेनेकडून जाहीरपणे भूमिका मांडली होती . पण यावेळी शिंदे शांत राहत आपली नाराजी दाखवून देत आहेत,इतकाच त्यामध्ये फरक आहे.अर्थात या नाराजी नाट्याचा 'क्लायमॅक्स' मुख्यमंत्री पदाऐवजी जास्तीत जास्त महत्त्वाची खाती पदरात पाडून घेणे हाच असेल, असे राजकीय जाणकाराकडून सांगण्यात येत आहे.

भाजपा श्रेष्ठीही हा विषय सामोपचाराने मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे प्रचंड बहुमत मिळाल्यानंतरही निकालानंतर ४ दिवस उलटूनही अद्याप पक्षाचा विधीमंडळातील नेता व मुख्यमंत्री पदासाठी नांव जाहीर करण्यात आलेले नाही.

एकनाथ शिंदे यांची पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनण्याची तीव्र इच्छा आहे.मात्र एकट्या भाजपाला मिळालेल्या १३२ जागा आणि त्यांना छोटे मित्र पक्ष व अपक्ष असे एकुण ५ आमदारांनी पाठिंबा जाहीर केला आहे.त्यामुळे ५७ आमदारांचे संख्याबळ पाठीशी असूनही

त्यांची 'बार्गेनिंग पॉवर' कमी पडत आहे. त्यातूनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर त्यांच्यात दूरावा निर्माण झाला आहे. २६/११ तील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एकत्र जमले असताना त्यांनी लांबूनच नमस्कार करत एकमेकावर दृष्टीश्रेप टाकण्याचे टाळले असल्याचे सांगितले जात आहे. विधानसभेत घवघवीत यश मिळूनही मुख्यमंत्रिपदावरून महायुतीमध्ये सध्या धुसफूस चालू आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री शिंदे हे मुख्यमंत्रिपदावर अडून बसले आहेत. तर सर्वांत मोठा पक्ष ठरल्यामुळे भाजपाने यावेळी कोणत्याही परिस्थितीत या पदाचा त्याग करायचा नाही असे ठरवले आहे . पक्षाच्या सर्व आमदारांची इच्छा देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रीपदी विराजमान व्हावेत ,अशी आहे. भाजपाचे केंद्रातील नेतेही त्यासाठी अनुकूल आहेत. मात्र शिंदेच्या आग्रहामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सामोपचाराने तोडगा काढून शिंदे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री पदासाठी फडणवीस यांचे नाव जाहीर करण्याचे पक्षश्रेष्ठींनी ठरवले आहे . त्यामुळे येत्या दोन दिवसात त्याबाबत चर्चा करून सरकार स्थापन केले जाईल अशा हालचाली वरिष्ठ पातळीवरून सुरू आहेत

### एकनाथ शिंदे यांच्याकडून दबाव

**महायुतीत भाजपा,शिवसेना आणि राष्ट्रवादी हे तिन्ही पक्ष एकत्र लढले. विधानसभा निवडणुकीला ते एकदिलाने सामोरे गेले. मात्र त्यावेळी मुख्यमंत्री पदाबाबतचा फॉर्मुला निश्चित करण्यात आलेला नव्हता आणि निकालानंतर शिंदे गट तीच बाप अधोरेखित करत संख्याबळापेक्षा ज्यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढवल्या त्यांना पुन्हा मुख्यमंत्री करावे, यासाठी आग्रह करत आहेत. त्यांच्या आमदारांकडूनही हीच भावना व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे भाजपा हा दबाव झुगारून फडणवीस हेच मुख्यमंत्री असतील, अशा भूमिकेत आहे. सामोपचारानं दोनही पक्षांच्या नेत्यांना समजावून सांगून यातून मार्ग काढला जाईल. वाटाघाटी पूर्ण केल्यानंतरच भाजपचा गटनेता निवडला जाणार आहे. त्यानंतरच भाजपाकडून निरिक्षक महाराष्ट्रात पाठवला जाणार असल्याचे भाजपाच्या गोटातून सांगण्यात आले..**

# आता मिळणार क्यूआर कोड असलेले नवे कार्ड

नवी दिल्ली : केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोमवारी घोषणा केली की सरकार पॅन २.० लागू करण्याच्या तयारीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक समितीने आयकर विभागासाठी पॅन २.० प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. हे पाऊल केंद्र सरकारच्या डिजिटल इंडिया या प्रमुख कार्यक्रमाच्या अनुषंगाने उचलण्यात आले आहे. सध्याच्या पॅन १.० चे हे अपडेटेड व्हर्जन असणार आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या नव्या प्रकल्पाची माहिती सोमवारी संसदेत दिली. पॅन क्रमांक बदलण्याची गरज नाही, असे देखील वैष्णव म्हणाले. या प्रकल्पावर १४३५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या योजनेनुसार सर्वांना नवे पॅन कार्ड दिले जाणार आहे. सध्याच्या पॅनकार्डधारकांना त्यांचे पॅन कार्ड बदलण्याची किंवा नवीन कार्डसाठी अर्ज करण्याची गरज नाही. पॅन अपग्रेडेशन विनामूल्य केले जाणार आहे. तसेच ते घरपोच देण्यात येणार आहे.

आर्थिक व्यवहारांसाठी पॅन कार्ड महत्त्वपूर्ण कागदपत्रांपैकी एक आहे. पॅन कार्डवर १० अंकी नंबर असतो, ज्यात वापरकर्त्यांची सर्व माहिती असते. या अंकांमधील माहिती प्राप्तिकर विभागाकडून ट्रॅक केली जाते. प्राप्तिकर विभाग एखाद्या व्यक्तीच्या सर्व व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी पॅनचा वापर करतो.

करदात्यांच्या नोंदणी सेवांच्या व्यावसायिक प्रक्रियेची माहिती ठेवण्यासाठी हा एक ई-गव्हर्नन्स उपक्रम आहे. संपूर्णपणे डिजिटल, सुरक्षित आणि प्रभावी आर्थिक प्रणालीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. याचा फायदा केवळ करदात्यांनाच नव्हे तर प्राप्तिकर विभागालाही होणार आहे. या नवीन प्रकल्पामुळे विभागाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गती येईल.

# कॅप्टन ठरला पण औपचारिक घोषणेचा मुहूर्त मिळेना!

## आज मुख्यमंत्री पदास शपथविधीची निश्चिती होणार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२५ नोव्हेंबर : प्रचंड बहुमत मिळूनही महायुती सरकारच्या स्थापनेला मुहूर्त मिळेना झाला आहे .महायुती -२चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असणार हे जवळपास निश्चित झाले आहे मात्र भाजपच्या दिल्लीतील पार्लमेंटरी बोर्डाची कडून त्याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही त्याचप्रमाणे शपथविधीचा मुहूर्तही निश्चित झालेला नाही. मुख्यमंत्रीपद व मंत्रिमंडळ चा फॉर्मुला निश्चित करण्यासाठी फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीला रवाना झाले असून त्यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर चर्चेनंतर त्याची निश्चिती होणार आहे.मंगळवारी त्याबाबतचा अधिकृतपणे घोषणा होईल असे समजते.

दरम्यान, एकनाथ शिंदे सरकारचा कार्यकाळ मंगळवारी संपत असल्याने नव्या सरकारच्या स्थापनेपर्यंत ते हंगामी मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

आज दिवसभर मुंबईत शिंदे गट व भाजपाच्या स्वतंत्रपणे मॅरेथॉन बैठका झाल्या एकनाथ शिंदे व अजित पवार यांना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने विधिमंडळाचे नेते म्हणून नियुक्ती केली असली तरी भाजपाकडून अद्याप नेत्याची विधिमंडळ नेत्याची निवड करण्यात आलेली नाही. उपमुख्यमंत्री फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत, अशी बहुतांश भाजपाच्या आमदारांची इच्छा असली तरी पक्ष शिस्तीचा भाग म्हणून नियुक्तीची केंद्रीय नेतृत्वाकडून निश्चिती होईपर्यंत नेता निवडीबाबतच्या घोषणा करण्याबाबत प्रतीक्षा केली जात आहे.

भाजपाचे बहुतांश आमदार मुंबईत दाखल झाले असून येत्या दोन दिवसात केव्हाही शपथविधी होण्याची शक्यता आहे नवनियुक्त आमदारांनी व भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी सागर बंगल्यावर जाऊन फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. सर्वांचा एक मुखाने फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत असा आग्रह आहे मात्र पक्ष शिस्तीच्या चौकटीत राहून सर्व कार्यवाही केली जात असल्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### शिंदे गट बिहार पॅटर्न साठी आग्रही

**शिवसेना शिंदे गटाने ५७ जागा पटकावित आपणच खरी शिवसेना असल्याचे निकालातून दाखवून दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढवल्या गेल्याने तेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावे त्यासाठी भाजपाने महाराष्ट्रातील बिहार पॅटर्न वापरावा अशी असा आग्रह शिंदे गटाकडून होत आहे मात्र भाजपा मुख्यमंत्रीपद कोणत्याही परिस्थितीत आपल्या हातून जाऊ न देण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे अडीच अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद हा एक पर्याय त्यांनी भाजपा समोर ठेवला असून ते शक्य न झाल्यास जास्तीत जास्त जास्तीत जास्त मंत्रीपद आपल्या वाट्याला घ्यावेत असा त्यांचा पवित्र आहे त्यासाठी भाजप षष्ठीवर भाजप श्रेष्ठीवर दबाव टाकण्यात यावा, अशी भूमिका शिवसेनेच्या आमदारांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे व्यक्त केली आहे.**

# काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांची आज बैठक

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२६ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीतील विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांची बुधवारी टिळक भवन येथील प्रदेश कार्यालयात बैठक होणार आहे यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला प्रमुख उपस्थित असणार असून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १ वाजता बैठक होईल.

लोकसभा निवडणुकीत एका बंडखोरासह १४ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला विधानसभेसाठी १०२ जागा लढवल्या होत्या. मात्र त्यापैकी अवघ्या १६ जागावर त्यांना विजय मिळविता आला आहे. त्यामुळे काँग्रेस निराशेच्या गर्तेत गेली आहे. उद्या होणाऱ्या बैठकीला

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, मुजफ्फर हुसेन, कुणाल पाटील, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

### आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास यांची प्रकृती बिघडली

चेन्नई : भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना आज, मंगळवारी पहाटे चेन्नईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले. दास यांना छातीत दुखत असल्यामुळे रुग्णालयात भर्ती करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. शक्तिकांत दास यांना सिडिटीचा त्रास झाल्याने चेन्नईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती ठीक आहे आणि पुढील काही तासांत त्यांना डिस्चार्ज देण्यात येईल. काळजी करण्याचे कारण नसल्याचे आरबीआयकडून सांगण्यात आले.

# महायुतीच्या विजयाच्या धसक्याने मौलाना नोमानींनी मागितली जाहीर माफी

मुंबई : राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. या घवघवीत यशानंतर दरदरुन घाम फुटलेल्या मौलाना सज्जाद नोमानी यांनी 'व्होट जिहाद'बाबत केलेल्या वक्तव्याबद्दल बिनशर्त माफी मागितली आहे. कोणत्याही समाजाला दुखावण्याचा आपला हेतू नव्हता, असे त्यांनी आता स्पष्ट केले आहे.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने २३५ जागा मिळवल्याने आता सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. एकट्या भाजपाने एकूण १३२ जागा जिंकल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीमध्ये लाडकी बहिण योजना, व्होट जिहाद आणि मराठा आरक्षण असे अनेक मुद्दे गाजले. त्यातील एक व्होट जिहादचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला होता. मौलाना सज्जाद नोमानी यांनी भाजपाला पाठिंबा देणा-या मुस्लिमांची खिल्ली उडवली आणि स्वत:चे नाव धनश्याम ठेवण्याचा सल्ला दिला होता. मात्र आता विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नोमानी यांनी बिनशर्त जाहीर माफी मागितली आहे. त्यांचा हेतू कोणत्याही विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्याचा किंवा फतवा काढण्याचा नव्हता, असे त्यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मौलाना सज्जाद नोमानी यांनी निवडणुकीदरम्यान वादग्रस्त फतवा काढला होता. राज्यातील भाजपाला पाठिंबा देणा-या मुस्लिमांना इस्लामच्या कक्षेबाहेर फेकून दिले पाहिजे. तसेच त्यादरम्यान त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामध्ये त्यांनी भाजपाला पाठिंबा देणा-या मुस्लिमांची खिल्ली उडवली. तसेच ज्या मुसलमानांनी भाजपाला पाठिंबा दिला त्यांनी आपले नाव बदलून धनश्याम करा, असा टोला लगावला होता.

# विश्व हिंदू परिषद व मंदिर अर्चक पुरोहित आयामातर्फे संविधान दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर

१९४६ साली संविधान सभा तयार करण्यात आली या संविधान सभेत २८९ सभासद होते. या संविधान सभेत डॉ.राजेंद्र प्रसाद पंडित जवाहरलाल नेहरू,सरदार वल्लभाई पटेल,चक्रवर्ती राजगोपालाचारी,डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी,टी टी कृष्णमाचारी,आर के सिधवा,आचार्य कृपलानी व एन व्ही गाडगीळ यासारखे विविध जाती धर्मातील नामवंत नेतेमंडळी यात होती

या मुख्य समितीतून एक लेखा समिती तयार करण्यात आली लेखा समितीचे काम संविधान लिहिण्याचं असतं.या समितीत सात सदस्य होते थोर घटना तज्ञ कायदे पंडित पूजनीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या समितीचे अध्यक्ष होते. लेखा समितीचे काम १४१ दिवस चाललं. लेखा समितीने घटना समितीसमोर ३९५ कलमांची घटना ठेवली २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी घटना समितीने ही घटना मान्य स्वीकारली अशी माहिती विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार यांनी दिली सुरुवातीला पीर बाजार मधील बौद्ध विहारातील पूजनीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत उपाध्यक्ष सौ कुंदाताई अंदुरे,महेश दोरवट पाटील ,सुभाष कुमावत अभिषेक कादि पद्मनाभ चौधरी गुरुजी रत्नप्रभा पोहेकर हेमलता कुलकर्णी नंदाताई क्षीरसागर आशिष भालेराव हे उपस्थित होते



यावेळी बोलताना जहागीरदार पुढे म्हणाले संविधानाची कलमे लिहिणे हे अतिशय कठीण काम असतं हे कठीण का तर अशा कलमामध्ये कमीत कमी शब्द असावे लागतात शब्दाचे अर्थ स्पष्ट असावे लागतात

या संविधानाचा जो मसुदा तयार झाला तो एकत्रित स्व हस्ताक्षरात इंग्रजीमध्ये प्रेम बिहारी यांनी लिहून सुंदर हस्ताक्षरात काढला यासाठी त्यांना सहा महिने लागले व एकूण ४३२ निब झिजल्या.

संविधानासाठी अनेकांचे हात लागले पण यामध्ये बाबासाहेबांची भूमिका प्रमुख होती हे सांगण्यासाठी त्यांनी एक गोष्ट सांगितली ते म्हणाले एक सुतार एक विनकर एक सोनार आणि एक मंत्र जाणारा पंडित असे चौघे प्रवासाला निघाले रात्री एका आरण्यात त्यांना थांबावे लागले आणि त्यांनी आळीपाळीने पहारा द्यायचं ठरवलं. सुतार प्रथम पहारा देण्यासाठी तयार झाला. वेळ घालवण्यासाठी म्हणून त्याने जवळच पडलेल्या लाकडाच्या ओंडक्यातून एक सुंदर बाहुली तयार केली. नंतर विणकर पहारा द्यायला उठला कपडे नसलेली बाहुली पाहून तिला सुंदर कपडे त्याने शिवले नंतर सोनार पहारा द्यायला उठला त्याने बाहुलीसाठी सुंदर दागिने तयार केले त्यामुळे ती बाहुली खूपच सुंदर तयार झाली शेवटी मंत्र जाणणारा पंडित उठला तो पहारा द्यायला लागला बाहुली पाहून ती जर सजीव झाली तर किती छान दिसेल असे त्याला वाटले म्हणून मंत्राने त्याच्यात त्याने प्राण ओतले. प्रश्न असा निर्माण होतो की बाहुली तयार करणारा सुतार मोठा की वस्त्रे शिवणारा विणकर मोठा की दागिने घडवणारा सोनार मोठा की प्राण देणारा पंडित मोठा या प्रश्नाचे उत्तर असं आहे की बाहुलीत प्राण भरणारा पंडित हा मोठा. ही गोष्ट सांगून जहागिरदार म्हणाले राज्यघटना अशीच तयार झाली आहे काही जणांनी रूप दिलं काही जणांनी आकार दिला काही जणांनी शब्द दिले परंतु यात प्राण भरण्याच काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केलं म्हणून पूजनीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान हे नातं अतूट आहे संविधानामुळे आपल्या देशाचा कारभार अत्यंत उत्तम पद्धतीने चालू आहे त्यामुळे आजच्या या ७५ व्या संविधान दिनाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देतो.

## अग्रलेख...

# सहिष्णुतेची नवी कसोटी!

केवळ काही वर्षे, दशकांचाच नव्हे, तर कित्येक शतकांचा आणि अनेक पिढ्यांचा सांस्कृतिक संघर्ष सामंजस्याच्याच मार्गाने संपुष्टात येऊ शकतो, हे अयोध्या वादातून निघालेल्या तोडग्याने दाखवून दिलेले असताना, असेच अनेक वादग्रस्त मुद्देही याच मार्गाने सोडविण्याचा सामाजिक समंजसपणा दाखविण्याची गरज आता पुन्हा एकदा समाजासमोर प्रभावीपणे मांडणे आवश्यक झाले आहे. अयोध्येतील जवळपास पाचशे वर्षांपासूनची वादग्रस्त वास्तू ही मूळची प्रभू रामचंद्रांची जन्मभूमी आहे आणि या जागेवर असलेल्या वास्तूच्या जागेवर पूर्वी मंदिर होते याचे असंख्य पुरातन व आधुनिक पुरावे समोर आल्यानंतरही या वादाने भारतातील दोन धर्मांच्या लोकांत तीव्र संघर्षाचे अनेक प्रसंग उद्‌भवले. सांस्कृतिक अस्मितेच्या अभिमानबिंदूंना धक्का लागला, तर अन्यथा सहनशील व सहिष्णू असलेला समाजदेखील संतापून उठतो आणि संघर्षास सिद्ध होतो, हा भारताचा इतिहास आहे. भारतावर गेल्या अनेक शतकांपासून अनेक परकीय आक्रमणे झाली आणि ज्या संस्कृतीच्या आधारावर या विभिन्न प्रांतरचना असलेल्या समाजाचे सामाजिक ऐक्य टिकून राहिले, त्या संस्कृतीचे अस्तित्वच पुसण्याचे अनेक प्रयत्नही झाले. सांस्कृतिक ऐक्य ही या खंडप्राय देशाची ताकद आहे आणि ते ऐक्य मोडून काढले तरच भारतावर सत्ता गाजविणे शक्य होईल हा परकीय आक्रमकांचा विचार होता. त्यामुळेच त्यांनी सामाजिक संवेदनांना धक्का देण्याचे तंत्र अवलंबिले. भारतीय समाज ज्यांच्याकडे शक्तिस्थळे म्हणून पाहतो, ज्यांच्या स्मरणाने, दर्शनाने आणि आराधनेतून या समाजास ऊर्जा प्राप्त होते, ती शक्तिस्थळे उद्ध्वस्त करून या समाजाचे मानसिक हनन करणे सोपे होईल असाच या आक्रमकांचा हेतू होता. तुमच्या शक्तिस्थळांहूनही आमची शक्ती अधिक आहे, असा संदेश देण्यासाठी व त्याद्वारे भारतीय समाजाचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी या आक्रमकांनी मंदिरांची नासधूस केली, तरीही या समाजाने हार मानलीच नाही हा इतिहास आहे. अयोध्येतील पाच शतकांहून अधिक काळाचा सांस्कृतिक अस्मितेचा मुद्दा केवळ न्यायालयाच्या आदेशाने सुटला हे मानणे शंभर टक्के योग्य नाही. कदाचित, कायद्याच्या चौकटीत तो तसा सुटलादेखील असता, पण ते तेवढेच झाले असते, तर सामाजिक नाराजीची भावना खदखदत राहिली असती. धार्मिक संघर्षाची बीजे कुठे तरी नवे कोंब फुटण्याची व योग्य वेळ येण्याची वाट पाहात स्वस्थ राहिली असती आणि या जाणिवेने सामाजिक अस्वस्थताही धुमसत राहिली असती. तसे झाले नाही, यावरूनच, सामाजिक सामंजस्य आणि संस्कृतीचा आदर करून समाजाच्या भावनांचा सन्मान करण्याची भावना जागी करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांचाही या समस्यापूर्तीमध्ये मोठा वाटा राहिला, हे आज संपूर्ण देशाने मान्य केले आहे.

म्हणूनच, जेथे अशा समस्यांची बीजे डोकी वर काढण्याची संधी शोधत असतात, तेथे अगोदर सामंजस्याच्या मार्गाने व संयमीपणाने तोडगा काढण्याचा केंद्रातील मोदी सरकारचा प्रयत्न असतो. अयोध्येचा वादग्रस्त मुद्दादेखील कायमचा निकाली निघून भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रद्धेचा विजय झाल्यानंतर अन्य वादग्रस्त मुद्देही याच मार्गाने सोडविण्यासाठी सरकार सरसावले आहे. भारतातील सर्वधर्मीय समाजाने सरकारची ही भावना प्रामाणिक असल्याचे मान्य केल्यास या प्रयत्नांना अधिक ताकद मिळेल आणि सौहार्दाचे वातावरणदेखील कायम राहील, अशी अपेक्षा करावयास हवी. पण गेल्या दशकभरातील राजकारणाचे रंग या अपेक्षेस फारसे अनुकूल नाहीत, हे वारंवार स्पष्ट झाले आहे. धर्माच्या, जातीच्या आणि आर्थिक स्तराच्या आधारावर समाजात वर्गभेद रुजविण्याचे राजकारण या प्रयत्नांस अडथळे आणू पाहात असल्याने, समाजातही संभ्रम निर्माण होतो आणि या प्रयत्नांची वाट अधिकच खडतर होऊ लागते. वस्तुतः, या देशाच्या प्राचीन सांस्कृतिकतेवरदेखील हिंदू समाजव्यवस्थेचाच प्रभाव आहे आणि शेकडो वर्षांच्या संस्कृतीची मुळे या जीवनशैलीतच रुजलेली आहेत, हे स्वयंस्पष्ट सत्य असताना, अशा वादांना खतपाणी घातले जाईल अशी कोणतीही भूमिका केवळ राजकीय स्वार्थ साधण्यापलीकडे काहीच साध्य करू शकत नाही, हे वारंवार स्पष्टदेखील झाले आहे. समाज म्हणून शतकानुशतके सोबत राहणाऱ्या समूहांना परस्परांच्या जीवनशैलीची, संस्कृतीची आणि अस्मितांचीदेखील नेमकी ओळख असल्याने, त्या जपण्याची सहिष्णुतादेखील समाजाने जपलेली आहे. मात्र, राजकारणातील तात्कालिक लाभाची गणिते अशा भावनांना तडे देऊ पाहतात, तेव्हा समाजात संभ्रम निर्माण होऊन त्याचा परिणाम संघर्षात होतो, हेही अनेकदा स्पष्ट झालेले आहे. अशा संघर्षांतून सामाजिक स्वास्थ्य बिघडते, परस्परांविषयी अविश्वासाच्या भावना वाढीस लागतात आणि अशांततेच्या शंकेमुळे अस्थैर्य निर्माण होऊन असुरक्षितता वाढते, हेही स्पष्ट असताना, असे वादग्रस्त मुद्दे सामंजस्याने सोडविण्याच्या प्रयत्नांस सहकार्य करण्याची भूमिका समाज व देशहिताच्या दृष्टीने आवश्यक असते. राजकीय स्वार्थाच्या गणितांपुढे मात्र ही गरज प्रभावहीन ठरत असल्याने, अनेक वादग्रस्त मुद्दे धुमसत राहतात आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम समाजाच्या मानसिक स्वास्थ्यावर होतात. त्यामुळे जुन्या वादांवर तोडगा काढण्याच्या नव्या प्रयत्नांस सामूहिक राजकीय साथ देण्याचा प्रामाणिकपणा राजकारणाने दाखवावयास हवा.

उत्तर प्रदेशातील संभल मशिदीच्या सर्वेक्षणाबाबत न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर तेथे उफाळलेल्या हिंसाचाराची दखल घेताना अशा काही शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे. संभल येथील या मुघलकालीन मशिदीच्या जागी अगोदर हरिहर मंदिर होते, असा दावा करणारी याचिका स्थानिक न्यायालयात दाखल करण्यात आल्यानंतर त्या वास्तूच्या सर्वेक्षणाचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार सर्वेक्षणाचे काम सुरू झाल्यावर या परिसरात हिंसक घटना घडू लागल्या. दगडफेकीचे प्रकार वाढले, सुरक्षा यंत्रणांवरच जमावांचे हल्ले सुरू झाले आणि काही जणांचा हिंसाचारात मृत्यू ओढवला. रविवारी या संघर्षास तोंड फुटले, सर्वेक्षणास विरोध करणाऱ्या जमावाने काही वाहने पेटवून दिली आणि लगेचच त्याचे राजकीय पडसादही उमटू लागले आणि विरोधकांची इंडिया आघाडी या हिंसाचारास प्रोत्साहन देत असल्याचा थेट आरोप सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने केला. अयोध्येतील राम जन्मभूमीवर बांधण्यात आलेल्या वास्तूचा आणि या मशिदीच्या उभारणीचा काळ एकच असल्याचे, म्हणजे सन १५२६ मध्येच ही मशीद उभारण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्याआधी याच जागेवर हरिहराचे मंदिर होते, असा याचिकाकर्त्याचा दावा असल्याने उभय बाजूंचे दावे प्रतिदावे पडताळून पाहणे न्याय्यच ठरते. सामाजिक समस्यांवर सामंजस्याने तोडगा काढण्याचा तो सुसंस्कृत मार्ग असतो. म्हणूनच, न्यायालयाच्या दारात दाद मागणाऱ्या कोणत्याही वादात शस्त्रांच्या साह्याने घुसखोरी करून बळाच्या जोरावर न्यायव्यवस्थेला आव्हान देणे गैर ठरते. यामुळेच, बाबरी वादाप्रमाणेच हा वादही सामंजस्यानेच सुटणे शक्य आहे याची जाणीव संघर्षशील समाजघटकांमध्ये रुजविण्याची गरज असताना, त्याला राजकीय वळण दिले गेल्यास तो अधिक चिघळण्याचीच शक्यता जास्त असल्याने, राजकारणाने त्यापासून अलिप्त राहणेच योग्य ठरते. देशातील सर्व समाजघटक परस्परांसोबत सौहार्दाने राहिल्यास सामाजिक स्वास्थ सुरक्षित राहते आणि आश्वस्ततेमुळे शांततेचे वातावरण राहिल्यास प्रगतीची वाटचाल सुनिश्चित होते. तसे व्हावे आणि वादाचे न्याय्य निराकरण व्हावे ही आजची देशातील सामाजिक गरज असताना, संभलमधील संघर्षाचे पडसाद अन्यत्र उमटल्यास शांतता व सुरक्षिततेच्या भावनांना धक्का पोहोचण्याची भीती आहे. न्यायव्यवस्था ही समाजातील समस्यांवर तोडगा काढणारी लोकशाही व्यवस्थेतील सर्वांत सक्षम आणि शक्तिशाली व्यवस्था आहे, हे या देशात सिद्ध झालेले आहे. समाजाने या व्यवस्थेला समंजसपणाने साथ दिली, तर शतकांचे संघर्षदेखील सहज सुटू शकतात, हे अयोध्या वादाने सिद्धदेखील केले आहे. म्हणूनच, संभल मशिदीच्या जागेच्या वादाचा मुद्दा न्यायालयाच्या दारात असताना, संघर्ष टाळण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावयास हवे.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# कॅनडात खलिस्तान्यांची एवढी वरवर का?

(पूर्वार्ध)

''कॅनडामधील खलिस्तानवादी दहशतवादी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येच्या कटाची पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री जयशंकर यांना माहिती होती, असा दावा करणारे कॅनडाच्या प्रसारमाध्यमांतील वृत्त म्हणजे मानहननाच्या मोहिमेचा भाग असून यामुळे दोन देशांतील आधीच ताणलेले संबंध अधिकच दुरावतील,'' असा इशारा भारताने कॅनडाला दिला आहे. त्यानंतर पंतप्रधान ट्रुडो यांनी असा कोणताही पुरावा उपलब्ध नाही, असा खुलासा केला आहे.

**कॅनडातील शीख :** कॅनडाची आजची लोकसंख्या सुमारे ३ कोटी ८२ लाख असून, यात २ कोटी ७४ लाख मतदार आहेत. कॅनडा मुळात बहुसांस्कृतिक आणि सर्वसमावेशकता असलेला देश आहे. म्हणून लोक या देशात नोकरी, शिक्षण आणि व्यवसाय यानिमित्त स्थायिक होण्यास उत्सुक असतात. भारतातील शीख, गुजराती, पंजाबी आदी भाषक लोक मोठ्या संख्येत कॅनडात स्थायिक झाले आहेत. कॅनडात तशी शिखांची लोकसंख्या आठ लाखच आहे; पण ती तीन प्रांतातच आणि काही विशिष्ट शहरांत किंवा मतदारसंघांतच केंद्रित झालेली आहे. त्यामुळे त्या त्या ठिकाणी शिखांच्या जबरदस्त मतपेढ्या उभ्या झाल्या आहेत. जसे की, ऑंटेरिओ प्रांतात ३ लाख, ब्रिटिश कोलंबियामध्ये २ लाख ९० हजार शीख वसलेले आहेत. आज कॅनडात २ टक्के शीख राहतात. पण मोजक्या जागी भरपूर शीख समुदाय हे आजच्या कॅनडाचे स्वरूप आहे, हे लक्षात घेतले की, कॅनडात शिखांचा एवढा प्रभाव का आहे, याचे आश्चर्य वाटणार नाही. कॅनडातील पार्लमेंटमध्ये ३३८ जागा आहेत. म्हणजे बहुमतासाठी १७० जागा हव्यात. सध्या कॅनडात जस्टिन ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीच्या १५९ जागा आणि खलिस्तानचा कट्टर समर्थक असलेल्या जगमित सिंग यांच्या न्यू डेमोक्रॅटिक पार्टीच्या २५ जागा मिळून एकूण १८४ जागांसह सत्तेत आहे. पण जगमित सिंग यांनी न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचा ट्रुडो सरकारला असलेला पाठिंबा काढून घेतल्याचे वृत्त आहे. त्यांची समजूत काढण्यासाठी कॅनडाची कवायत सुरू आहे, असे मानतात.

**पक्षीय बलाबल :** कॅनडातील पार्लमेंटमध्ये पक्षीय बलाबल असे आहे. एकूण जागा ३३८ आहे. १) जस्टिन ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीजवळ १५९ जागा व (३२.६२ टक्के मते) आहेत. हा जुना, उदारमतवादी, डावीकडे झुकलेला पक्ष मानला जातो. सध्या हाच प्रमुख शीखधार्जिणा पक्ष आहे. २) एरिन ओ टूल यांच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीजवळ ११९ जागा व (३३.७ टक्के मते) आहेत. हा उजवीकडे झुकलेला विरोधी पक्ष आहे. ३) इव-फ्रान्स्वा ब्रॅकॉईस ब्लांचेट यांचा ब्लॉक क्युबेकॉईस पार्टी हा पक्ष ३३ जागा व ७.६४ टक्के मते बाळगून आहे. हा एकेकाळी फुटीरतावादी पक्ष होता; आता मात्र याची भूमिका प्रादेशिक स्वायत्ततावादी पक्षाची आहे. ४) जगमित सिंग (डाव्या विचारसरणीचे, खलिस्तानवादी व फौजदारी वकील) यांचा न्यू डेमोक्रॅटिक पार्टी मुळातला सर्वसमावेशक आणि लिबरल पार्टीला मदत करणारा पक्ष होता; पण सध्या खलिस्तानी शिखांच्या वर्चस्वाखाली असून २५ जागा १७.६३ टक्के मते यासह खलिस्तानचा समर्थक आहे. ५) ॲनॉमी पॉल/एलिझाबेथ मे यांचा पर्यावरणवादी ग्रीन पार्टी २ जागा आणि २.३३ टक्के मते मिळवून कसाबसा टिकून आहे.

**भारताने जबरदस्त पाऊल :** भारताने कॅनडाच्या भारतातील ६ अधिकाऱ्यांना (डिप्लोमॅट) भारत सोडून जाण्याचा आदेश (एक्सपेल) १४ ऑक्टोबर २०२४ ला दिला. हे अधिकारी व त्यांची पदे अशी आहेत. १) स्टीवर्ट रॉस व्हीलर, कार्यवाहक (ॲक्टिंग) हाय कमिश्नर, २) पॅट्रिक हेबर्ट, डेप्युटी हायकमिश्नर, ३) मारी कॅथरिन ज्योली, फर्स्ट सेक्रेटरी, ४) इयान रॉस डेव्हिड ट्राईट, फर्स्ट सेक्रेटरी, ५) ॲडम जेम्स च्युइप्का, सेक्रेटरी, ६) पॉला ओर्ज्युला, फर्स्ट सेक्रेटरी. यातील पदांचा उल्लेख यासाठी महत्त्वाचा ठरतो की, त्यावरून भारताने केवढे मोठे आणि जबरदस्त पाऊल उचलले आहे, ते जाणवावे. सामान्यतः युद्धजन्य परिस्थितीतच असे पाऊल उचलले जाते.

या अगोदर कॅनडाने भारताचे कॅनडात नेमलेले वरिष्ठ अधिकारी, कॅनडाचा नागरिक असलेल्या एका खलिस्तानवादी कार्यकर्त्याच्या, म्हणजे हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत सामील असल्याचा आरोप केला होता. हे पाहून भारताने आपले कॅनडातील हायकमिश्नर संजयकुमार वर्मा यांच्यासह आणखी काही अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतले आहे आणि उत्तरादाखल कॅनडाच्या सहा अधिकाऱ्यांना भारत सोडून जाण्यास सांगितले आहे. मतपेढीच्या राजकारणाला बळी पडून कॅनडा शासनाने हा हत्येबाबतचा हास्यास्पद आरोप केला आहे. अशा प्रकारचे आरोप करून शिखांची मते मिळविण्याचा हा प्रयत्न आहे, हे स्पष्ट आहे. कॅनडा सरकारचे अस्तित्वच अशा पक्षाच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे की, ज्या पक्षाचे नेते भारतातील फुटीरतावाद्यांशी संबंध ठेवून आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिखांनी कॅनडामध्ये स्थलांतर करायला सुरुवात केली. आज कॅनडात २ टक्के शीख आहेत. खलिस्तान्यांवर भारतात कारवाईला सुरुवात करताच त्या शिखांनी कॅनडात जायला वेगाने सुरुवात केली. खलिस्तानच्या प्रश्नावर जगाचे लक्ष प्रथम वेधून घेण्यास तेव्हाच खऱ्या अर्थाने सुरुवात केली होती. आज खलिस्तानचा मुद्दा न भारतात महत्त्वाचा आहे न कॅनडात. शिखांची संख्या लक्षात घेऊन ट्रुडो यांच्या पक्षाने त्यांना चुचकारण्यास सुरुवात केली व शिखांना खूश करून त्यांची मतपेढी आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी त्यांच्या मागण्या एकापाठोपाठ एक मान्य करण्यास प्रारंभ केला. २००१ ते २०२१ या अल्प कालावधीत शिखांची कॅनडातील टक्केवारी ०.९ वरून वाढत २.१ टक्क्यांपर्यंत पोहोचली. १९९३ मध्ये पंजाबात जन्मलेला गुरुबक्ष सिंग माल्ही हा पहिला शीख कॅनेडियन नागरिक लिबरल पार्टीच्या तिकिटावर पार्लमेंटवर निवडून आला तर २०२१ मध्ये २१ शीख पार्लमेंटवर निवडून गेले आहेत.

**आजची न्यू डेमोक्रॅटिक पार्टी :** आतापर्यंत न्यू डेमोक्रॅटिक पार्टी मध्यम मार्गी, पण डावीकडे झुकलेला पक्ष ट्रुडो सरकारला पाठिंबा देत होता. पुढे या पक्षाचा नेता जगमित सिंग याने खलिस्तानच्या मागणीला उघडउघड पाठिंबा देणे सुरू केले. २००४ पासून शिखांचा कॅनडाच्या राजकारणात प्रभाव वाढताना पहिल्यांदा कॅनडाच्या वृत्तसृष्टीला जाणवू लागले. कॅनडातील उदारमतवादी पक्ष स्थलांतरितांच्या बाजूचे आहेत. त्यांची मते आपल्यालाही मिळावीत या हेतूने उदारमतवादी पक्षांचे अनुकरण करीत कॅनडातील कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षानेही शिखांना चुचकारण्यास सुरुवात केली आहे.

धर्मानुसार कॅनडातील लोकसंख्येचे विभाजन असे आहे- ख्रिश्चन ५३.३ टक्के, कोणताही धर्म न मानणारे ३४.६ टक्के, मुस्लिम ४.९ टक्के, हिंदू २.३ टक्के, शीख २.१ टक्के, बौद्ध १ टक्का, ज्यू ०.९ टक्के, अन्य ०.८ टक्के. म्हणजे शीख धर्म हा कॅनडातील चौथा सर्वात मोठा धार्मिक गट आहे. कॅनडातील शीख समुदाय गुरुद्वारांच्या माध्यमातून स्थानिकांना आणि अन्य संघटनांना मदत करू लागले. या विषयाबाबत स्थानिकांसाठीचे कायदे कॅनडात स्थलांतरितांच्या तुलनेत अधिक कडक आहेत. त्यामुळे स्थानिक राजकारणेतर समुदायही साहजिकच त्यांच्याशी अधिकाधिक जवळीक साधू लागले आहेत.

९४२२८०४४३०

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# होय, हे धर्मयुद्धच लढले गेले

पूर्वी युद्धे तलवारीने लढली जायची. धर्मासाठी रणांगणामध्ये रक्तांचे पाट वाहायचे. त्यानंतर काळ बदलला अन् लोकशाहीमध्ये मताच्या रूपाने हे युद्ध लढले जाऊ लागले. भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रात प्रथमच २० नोव्हेंबरचा लोकशाहीचा उत्सव धर्मयुद्धासारखा लढला गेला. यावेळी प्रथमच संपूर्ण महाराष्ट्राने भगवी लाट अनुभवली. विरोधकांच्या अपेक्षेबाहेर भाजपाला यश मिळाले. काँग्रेसच्या विखारी प्रचाराला मतदारांनी सडेतोड उत्तर देऊन त्यांनी काँग्रेसला त्याची जागा दाखवून दिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गलिच्छ राजकारण करून काँग्रेसने समाजामध्ये जातीयतेचे विष पेरले. खोट्या धर्मनिरपेक्षतेची दवंडी देऊन काँग्रेसने घराणेशाहीला सर्वाधिक महत्त्व देत राष्ट्राला दुय्यम स्थान दिले. वाट्टेल त्या थराला जाऊन महाविकास आघाडीला राज्याची सत्ता हवी होती. काँग्रेसच्या भूलथापांना बळी न पडता व्होट जिहादला मतदारांनी धर्मयुद्धाने चोख प्रत्युत्तर दिले. वाढलेली मतदानाची टक्केवारी हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे.



नेहमीप्रमाणे समाजामध्ये विष पेरून हिंदूंच्या मतविभाजनाचा आटोकाट प्रयत्न यावेळीही काँग्रेसने करून बघितला. परंतु, तो त्यांच्याच अंगलट आला. महाविकास आघाडीला फक्त ४६ जागांवर मतदारांनी नेऊन ठेवले. अखेर त्यांना आपल्या कर्माची फळे मिळाली. राहुल गांधींना या देशाची संस्कृती, परंपरा आणि उज्ज्वल भविष्याशी काहीएक देणेघेणे नाही. मातृभूमी या संकल्पनेला त्यांचा विरोध, प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वालाही त्यांचा विरोध आहे. त्यामुळे ठासून खोटे बोलले की, लोकांना ते खरे वाटायला लागते. राहुल गांधीची ही चाल नेमकी यावेळी लोकांनी ओळखली. भारतामध्ये आरक्षणाचे तारणहार म्हणून मिरवायचे अन् परदेशामध्ये जाऊन आरक्षण संपविण्याच्या गोष्टी करायच्या हा दुटप्पीपणाही लोकांनी हेरला. जवळपास ६० वर्ष खोट्या धर्मनिरपेक्षतेचा येथील हिंदूंनी सतत मार खाल्ला. दुसऱ्या पक्षाला जातीयवादी म्हणणारी काँग्रेस किती जातीयवादी आहे, हे ओळखण्यास लोकांना जवळपास ६० वर्षे लागली. ६० वर्षे काँग्रेस हिंदूंच्या अस्मितेशी खेळली. संस्कृती आणि परंपरा पायी तुडविल्या. गुलामीच्या मानसिकतेमधून काँग्रेसने लोकांना बाहेर येऊच दिले नाही. जगामध्ये सर्वाधिक सहिष्णू कोण असेल तर तो हिंदू होय. जगा आणि जगू द्या, हा एकच हिंदूंचा मंत्र आहे. नेमका याच बाबीचा फायदा घेत काँग्रेसने येथील हिंदूंना कायम दुय्यम नागरिकाचे स्थान दिले. अशी ही हिंदुद्रोही काँग्रेस भारतामध्ये कशी फोफावली हेही एक आश्चर्यच म्हणावे लागेल. मतांच्या राजकारणासाठी यावेळी काँग्रेसने नैतिकतेचे सर्वच मार्ग सोडून दिले होते. त्यामुळे 'बटेंगे तो कटेंगे' हा योगी आदित्यनाथ यांचा नारा व 'एक हैं तो सेफ हैं' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नारा या निवडणुकीमध्ये काँग्रेसवर भारी पडला. सत्तेच्या मोहापायी उद्धव ठाकरेही भरकटत गेले. त्यांनी हिंदुत्व सोडले त्यामुळे मतदारांनीही त्यांना सोडले अन् शरद पवारांचा छुपा हेतू साध्य झाला. हिंदू या राष्ट्राचा कणा आहे, हे उद्धव ठाकरेही साफ विसरले. संस्कृती आणि परंपरा या देशाचा आत्मा आहे, हे पण उद्धव ठाकरे विसरले. त्यामुळे जे व्हायचे होते ते होऊन गेले. निव्वळ सत्तेसाठी केलेले राजकारण अधिक काळ टिकू शकत नाही, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही कळले नाही. देशाला खिळखिळे करणाऱ्या विघातक शक्ती अजूनही देशाबाहेर कार्यरत आहेत. काँग्रेसही सतत त्यांच्या पाठीशी उभी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे काँग्रेसने येथील हिंदूंना सतत दाबण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, सनातन वैदिक परंपरेच्या भक्कम पायावर उभा असलेला हा देश कधीच वाकला नाही आणि कधीच वाकणारही नाही, हे त्रिकालबाधित सत्य आहे. आपल्याच काळ्या कृत्याने काँग्रेस आतून पूर्णपणे खिळखिळी झाली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. काँग्रेसचा पूर्वीपासून सुरू असलेला हा दुटप्पीपणा लोकांनी यावेळी ओळखला. तो कायम स्मरणात ठेवला तरच या देशाचे भविष्य उज्ज्वल राहू शकते, एवढे मात्र नक्की.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# पंतप्रधान इंटर्नशिप योजना : नव्या संधींचा आशादीप

नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या 'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेंतर्गत देशातील प्रमुख व निवडक अशा ५०० कंपन्यांमध्ये नवोदित विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या असून, विद्यार्थ्यांचाही या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसतो. यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून नव्याने उत्तीर्ण झालेल्या पात्रताधारक उमेदवारांना नवागत म्हणून आपल्या करीअरची सुरुवात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेच्या संदर्भात स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच नमूद केल्यानुसार देशातील आर्थिक व्यवसाय क्षेत्रातील प्रमुख व प्रथितयश अशा ५०० कंपन्यांमध्ये योजनेच्या पहिल्या टप्प्यात 'इंटर्नशिप योजना' अमलात आणली जाणार आहे. योजनेचा मुख्य उद्देश या कंपन्यांना बरेचदा भासणारी प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता काही प्रमाणात कमी करणे व त्याचवेळी नव्याने उत्तीर्ण झालेल्या विविध विषय आणि क्षेत्रातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या प्रशिक्षणातून सुरुवातीची रोजगार संधी उपलब्ध करून देणे, अशा दुहेरी स्वरूपाचा आहे. योजनेच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच टप्प्यात अर्थमंत्रालयातर्फे करण्यात आलेल्या प्राथमिक अभ्यासानुसार, या नव्या 'इंटर्नशिप योजने'चा फायदा महानगरांपेक्षा तुलनेने मध्यम आकारातील म्हणजेच तृतीय स्तरीय शहरातील कंपन्यांना तुलनेने अधिक होऊ शकतो.

केंद्र सरकारची ही योजना प्रामुख्याने युवक व नव्याने शैक्षणिक पात्रताधारकांसाठी असल्याने देशातील युवा आणि विद्यार्थ्यांच्या संदर्भातील वस्तुस्थिती आणि आकडेवारीचा तपशील जाणून घेणे आवश्यक ठरते. यासंदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार, सध्या देशांतर्गत युवकांच्या एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकसंख्या ही १५ ते २९ या वयोगटातील आहे. सद्यःस्थितीत या वयोगटातील निम्मी संख्या ही नव्याने शैक्षणिक पात्रताधारक व रोजगारक्षम आहे. त्यातही यातील बहुसंख्य विद्यार्थी-उमेदवार हे महानगरांच्या तुलनेने छोटी शहरे वा जिल्हा स्थाने अथवा औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रदेशांतील रहिवासी आहेत. हेच विद्यार्थी नव्या पंतप्रधान 'इंटर्नशिप प्रशिक्षण योजने'च्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरू शकतात.

**'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेचा थोडक्यात तपशील असा :** या योजनेंतर्गत प्रमुख व निवडक अशा ५०० कंपन्यांमध्ये नवोदित विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाईल. प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्ष असेल. या योजनेमागे सरकारचा मुख्य उद्देश शिक्षित नवयुवकांना प्रशिक्षित करून रोजगारक्षम करणे आहे. यासाठी २१ ते २४ या वयोगटातील शालान्त परीक्षा, तंत्रशिक्षण, पदवी-पदव्युत्तर, चार्टर्ड अकाऊंटन्सी असे शैक्षणिक पात्रताधारक व अल्प उत्पन्नधारक गटातील उमेदवार अर्ज करू शकतील.

वरील प्रशिक्षण कालावधीत निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या एक वर्ष कालावधीसाठी दरमहा पाच हजार रुपये पाठ्यवेतन देय असेल. यापैकी ४ हजार ५०० रुपये सरकारतर्फे व ५०० रुपये संबंधित कंपनीतर्फे देण्यात येतील. याशिवाय वार्षिक सहा हजार रुपये अतिरिक्त खर्चापोटी देण्यात येतील. पंतप्रधान इंटर्नशिप योजनेच्या पहिल्या व प्रायोगिक टप्प्यात २०२४ साली सुमारे १ लाख २५ हजार विद्यार्थी-युवकांना समाविष्ट करून घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. योजनेला अधिक लवचीक बनविण्यासाठी त्यामध्ये सहभागी होणाऱ्या कंपन्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असणारा 'सीएसआर' निधी या योजनेसाठी वापरण्याचा व्यवहार्य पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या नव्या सवलतीचा लाभ आता संबंधित कंपन्या सहजपणे घेऊ शकतात.

'पंतप्रधान इंटर्नशिप' योजनेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनंतर त्यानुसार कौशल्य विकास, संबंधित व प्रत्यक्ष कामाचा सराव व काही प्रमाणात पाठ्यवेतन असे विविध लाभ हमखासपणे होणार आहेत. याशिवाय योजनेत प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांना मिळणारा अनुभव त्यांना संबंधित कंपनीच नव्हे, तर इतर उद्योग-व्यवसाय क्षेत्रात करीअर सुरू करण्यासाठी लाभप्रद ठरू शकते. याशिवाय नव्याने विविध अभ्यासक्रमांत उत्तीर्ण झालेल्या व मध्यम आकारातील शहरांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नोकरी-रोजगार व स्पर्धेच्या संदर्भात जी संकोच वा प्रसंगी संभ्रमाची भावना असते, त्यावर तोडगा म्हणून नवी 'इंटर्नशिप प्रशिक्षण योजना' फायदेशीर ठरू शकेल. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना रोजगारासाठी निवड-मुलाखतीचा सराव व निवड झाल्यावर प्रत्यक्ष कामाची व्यावहारिक माहिती व अनुभव मिळतो. याचा लाभ त्यांना पुढील मुलाखत व अन्यत्र निवडीसाठी होऊ शकतो. उमेदवारांना त्यांच्या प्रशिक्षण काळात उद्योग-व्यवसायाच्या प्रक्रियेपासून संगणकीय कार्यपद्धतीपर्यंतच्या विविध कार्यपद्धतींचा प्रत्यक्ष सराव मिळू शकतो. तसे पाहता, प्रशिक्षणासाठी 'इंटर्नशिप' पद्धतीचा वापर आपल्याकडे नवीन नाही. त्याचा अवलंब मुख्यतः विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून बहुधा सर्वच प्रमुख संस्था वा विद्यापीठ स्तरावर केला जातो. त्याद्वारे अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यासक्रमाच्या अंतिम टप्प्यात काही आठवड्यांच्या माहिती व उद्योग-व्यवसायात काम करणे आवश्यक ठरते. पदव्युत्तर वा तंत्रशिक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रमात तर विद्यार्थ्यांना त्यांच्या या अल्पकालीन प्रशिक्षण कालावधीत माहितीशास्त्र-संगणक तंत्रज्ञान, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, मूलभूत व्यवस्थापन या क्षेत्राची मूलभूत माहिती देण्याचे महत्त्वपूर्ण काम होणार आहे. कंपनी व्यवस्थापनांच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, कंपन्यांना त्यांच्या नव्या व वाढत्या व्यावसायिक गरजा लक्षात घेता, प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता नेहमीच असते. विशेषतः अशा प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी कंपन्यांचे प्रयत्न सुरूच असतात. विविध अभ्यासक्रमांसह उत्तीर्ण होणाऱ्या नव्या व पात्रताधारक उमेदवारांना कंपन्या प्रशिक्षणाच्या संधी देत असतात. प्रसंगी त्यासाठी अशा विद्यार्थ्यांसाठी पाठ्यवेतनापासून प्रशिक्षणापर्यंत तरतूद करतात. कंपन्यांच्या याच प्रयत्नांना आता 'पंतप्रधान इंटर्नशिप योजने'द्वारा मर्यादित स्वरूपात का होईना, पण पाठ्यवेतनासह सरकारी पुढाकार व प्रयत्नांसह प्रोत्साहन मिळणार आहे.

पंतप्रधान इंटर्नशिप योजनेची अंमलबजावणी म्हणजे मूलतः २०२० सालच्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा मोठा व महत्त्वपूर्ण टप्पा म्हणायला हवा. या धोरणांतर्गत केंद्र सरकारने कौशल्याधारित शिक्षणाद्वारे प्रशिक्षित युवावर्ग व उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा मोठा व महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. त्याच निर्णयाची नियोजनपूर्ण व वेळेत अंमलबजावणी यानिमित्ताने होत आहे, हे महत्त्वाचे. जाणकारांच्या मते, प्रचलित परिस्थितीत शैक्षणिकदृष्ट्या विविध क्षेत्रांतील पात्रताधारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता असून केवळ अनुभव नाही, या चाकोरीबद्ध मानसिकतेमुळे नोकरी-रोजगार मिळण्यास नेहमीचीच अडचण येते व नोकरीची सुरुवातच न झाल्याने, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेला अनुसरून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. तेव्हा, प्रचलित शिक्षण-रोजगार क्षेत्राशी असणाऱ्या मर्यादांना काही प्रमाणात छेद देण्याचे काम आता नव्याने होणार आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### मतदारयाद्या वेळीच दुरुस्त करा

नेमेचि येतो मग पावसाळा तसे प्रत्येक निवडणूक झाल्यावर मतदारयाद्या अचूक नाही अशी ओरड होते. ज्यांचे निधन झाले त्यांची नावे यादीत दिसतात. 'डिलिटेड' असे स्टॅम्प असून ते मोजतात. डबल नावे, नावे नसणे, घर, गाव, देश बदलून, सोडून गेले त्यांची नावे असणे, घरातील एकाचेच नाव दुसऱ्याच यादीत असणे, आधी नाव असणे आणि आता नसणे.

आमचेच उदाहरण घेतो. रामनगर ३०२, ३०३ बुथवर २४००+ नावे आहेत. त्यातील वर सांगितल्याप्रमाणे नावे काढल्यास ती संख्या १६००+ येईल. १६०० पैकी ११५० मतदान झाले. पण मोजताना टक्के २४००+ वर काढून मग रामनगरमध्ये मतदान टक्केवारीने कमी दिसते. पण हे फक्त दोन बुथचे. असे नागपुरात ३०००+ बुथ आहेत म्हणजे हे प्रमाण फार जास्त होते. मतदान कमी झाले असे म्हणणे त्यामुळे बरोबर नाही.

दुसरे जर नावे बरोबर आली तर मतदान चिठ्ठ्या वाटणे सोपे होते. तिसरे महत्त्वाचे आता जनगणना होईल. लोकसंख्या पाहून वॉर्ड, प्रभाग, विधानसभा, लोकसभा क्षेत्रे तयार होतील. अचूक याद्या नवीन रचना करतील. काही कमी जास्त होतील. जुन्या चूक मतदारयाद्या हे प्रारूप चुकीचे करतील.आता तरी या चुका दुरुस्त व्हाव्या असे आपण प्रयत्न करूया असे वाटते.

**रवी वाघमारे**/९९६००१८०३०

●● ●●

## वाचक पत्रे

### विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीने विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवले. एकट्या भाजपाने १३२ जागा जिंकल्या. महायुतीने विधानसभेत बहुमतासाठी आवश्यक असलेल्या जागांपेक्षा कितीतरी जास्त जागा जिंकल्या. महायुतीच्या या ऐतिहासिक बहुमताचा देशाच्या एकूणच राजकारणावर परिणाम होणार आहे. महायुतीचा प्रचंड विजय हा भारतीय मतदारांमधील विरोधी पक्षाच्या विशेषतः काँग्रेस, उबाठा आणि शरद पवारांच्या तसेच मुस्लिम तुष्टीकरणविरोधी तीव्र भावनांचा परिणाम आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

●● ●●

### लाडक्या बहिणींचे मन:पूर्वक आभार



काही दिवसापूर्वी म्हणजे महाराष्ट्र राज्य विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर मी याच स्तंभाद्वारे समस्त लाडक्या बहिणींना आता परतफेड करण्याची जबाबदारी त्यांची आहे, असे आवाहन केले होते. जाहीर झालेल्या निकालाने हे सिद्ध झाले आहे की, लाडक्या बहिणींनी उदारपणे आपल्या मतदानाने महायुती सरकारवर आपले प्रेम व विश्वास व्यक्त करून महायुती सरकारला प्रचंड बहुमताने विजयी केले आणि लाडकी बहीण म्हणून मिळालेल्या मदतीची परतफेड केली आहे. त्यामुळे सर्व बहिणींचे मन:पूर्वक आभार.

**राजीव दारव्हेकर**/१०९६३२२२००

●● ●●

### उद्धव ठाकरे, शरद पवारांना जनतेने नाकारले

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल अनपेक्षित पण ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे जेव्हा एखाद्या युतीला दोनशेपेक्षा जास्त जागा मिळाल्या. जनसामान्यांनी उद्धव ठाकरेंना साफ नाकारले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी हिंदुत्वाशी तोडलेले नाते हे जनतेला आवडले नाही. 'मलाच मुख्यमंत्री करा' हा त्यांचा अहंकारी दुराग्रहही त्यांच्या विरोधात गेला. एकनाथ शिंदेंची शिवसेना खरी शिवसेना आहे ही गोष्ट जनतेने ठळकपणे अधोरेखित केली आहे. तसेच मतदाराने मतपेटीतून काँग्रेस व शरद पवार यांच्यावरही अविश्वास व्यक्त केला आहे. पवारांनी आता राजकारणातून संन्यास घ्यावा हेच जणू मतदाराने सांगितले आहे. तरीही त्यांनी राजकारणात लुडबुड चालू ठेवली तर त्यांना यापेक्षाही जास्त अपमानाची मानसिक तयारी ठेवावी लागेल. मविआमधील भांडणे विकोपास गेली होती. 'मोठा भाऊ' वाद, जागावाटपातील मतभेद, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा अशा अनेक कारणांनी आघाडीतील घटकपक्षात मनभेद निर्माण झाला होता. याउलट महायुतीतील घटकांनी आपसात चांगला समन्वय ठेवला होता. वादाचा एकही मुद्दा नव्हता. मतदानाची टक्केवारीही वाढली होती. त्याचा फायदा युतीला नक्कीच मिळाला. ज्यांचा पराभव झाला त्यांनी गंभीरपणे आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. इतिहास सांगतो की, जे आत्मचिंतन करत नाही ते राजकारणातून लुप्त होतात.

**अरविंद तापकिरे**/९८१९७९४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीतील हाणामारी प्रकरणी परस्पर तक्रारीवरून गुन्हे दाखल

## दोन्ही गटातील ११ जणांना अटक, धरपकड मोहीम सुरू



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

हिंगोलीत भाजप आणि शिंदे गट शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. या हाणामारीत एकाला पोटात गोळी लागली होती. तसेच भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांचे नातेवाईक संजय चव्हाण हे देखील गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात दोन्ही गटाच्या परस्पर तक्रारीवरून ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दोन्ही गटातील ११ जणांना पोलिसांनी अटक केली असून धरपकड मोहीम चालूच आहे.

निवडणुक निकालाच्या दिवशी शिंदे शिवसेना आणि भाजपचे कार्यकर्त्यांमध्ये तुफान हाणामारी झाली होती. या हाणामारीनंतर शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांच्या घरावर ६० ते ७० जणांनी हल्ला करीत संजय चव्हाण यांना तलवार, कत्तीने जबर मारहाण करण्यात आली तसेच धरासमोर असलेले चारचाकी वाहनाची तोडफोड करण्यात आली होती. या हाणामारील शिंदे गट शिवसेनेच्या एकाला पोटात गोळी लागल्यामुळे त्यांना उपचारासाठी नांदेड त्यानंतर हैद्राबाद येथे हलविण्यात आले आहे. या हाणामारीनंतर शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील, पोनि नरेंद्र पाडळकर यांनी घटनास्थळी ताफ्यासह भेट देत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

याप्रकरणी शिंदे गटाचे विशाल आठवले यांनी दिलेल्या तक्रारीवरून पप्पू चव्हाण यांनी गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, अमोल देशमुख, विवेक देशमुख, राजु जोजार, विकास जोजार, केशव तनपुरे यांना अटक करण्यात आली आहे. अजूनही पोलिसांची धरपकड मोहीम सुरू आहे.

तर भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांच्या तक्रारीवरून दि २३ नोव्हेंबर रोजी रात्री चेतन नागरे, अजय नागरे, गोपाल बांगर, करण बांगर, चौधरी, सांगळे यांच्यासह ६० ते ७० जणांनी गैरकायद्याची मंडळी जमवून गाडीवर लाथा व बुक्क्या मारू लागले. तेव्हा पप्पू चव्हाण यांचेसोबत असलेल्या गाडीवर लाथा का मारीत आहात अशी विचारणा केली असता यावेळी पप्पू चव्हाण गाडी मागे घेत असतांना त्यांच्या साथीदाराला आरोपी मारहाण करीत होते तसेच करण बांगर आणि चेतन नागरे यांनी पिस्टल काढून पप्पू चव्हाण व त्यांच्या साथीदारास धमकाऊ लागले तसेच पप्पू चव्हाण यांच्या राहते घरी जावून आरोपीतासह ६० ते ७० जणांनी घराच्या काचा फोडून व चार चाकी वाहनाचे काचा फोडून, बोनेटवर दगड मारून नुकसान केले. तसेच संजय चव्हाण यांना तलवारीने हातावर, मानेवर, डोक्यावर, पाठीवर मारून जखमी केले अशा तक्रारीवरून शहर पोलीस ठाण्यात आरोपीताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी श्रीकांत बांगर, ऋषीकेश जगताप, हनुमान तारे, वैभव तारे, विशाल तारे यांना अटक केली आहे.

दरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्हीच्या माध्यमातून इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे. या घटनेत गोळीबारासाठी वापरलेली पिस्टल आणले कोठून याचा तपास पोलिस करीत आहेत. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तर कायदा हातात घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी दिला आहे.

# आंतरराष्ट्रीय दत्तक महिनानिमित्त औंढा येथे जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

आंतरराष्ट्रीय दत्तक महिना निमित्ताने हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील पोलीस स्टेशन, ग्रामीण रुग्णालय, बसस्थानक येथे दि. २४ नोव्हेंबर रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती करण्यात आली.

नोव्हेंबर महिना हा आंतरराष्ट्रीय दत्तक महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्प लाईन १०९८ कडून बालकासंदर्भात आणि बालकाशी निगडीत विविध विषयावर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. कोणतेही बालक परस्पर दत्तक घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करुन कायदेशीर प्रक्रिया पार पाडून इच्छुक पालक बालकाला दत्तक घेऊ शकतात, अशी माहिती चाईल्ड हेल्प लाईन (उक्ङ) १०९८ हिंगोलीचे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे यांनी बालकांच्या कायद्याविषयी तसेच दत्तक प्रक्रिये संदर्भात माहिती दिली. बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन १०९८ बाबतची, बालहक्क सप्ताह व चाईल्ड हेल्प लाईन १०९८ ची माहिती समुपदेशक अंकुर पाटोडे यांनी दिली. बालकांसाठी असलेल्या बाल संगोपन योजनेविषयीची माहिती राजरत्न पाईकराव यांनी दिली. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी केले.

यावेळी चाईल्ड हेल्प लाईनचे पर्यवेक्षक श्रीकांत वाघमारे, केस वर्कर सुरज इंगळे, औंढा नागनाथ पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक नागरे व पोलीस कर्मचारी, ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. हरण, बसस्थानक प्रमुख वाकळे व प्रवासी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ठिकठिकाणी संविधान दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

भारतीय संविधान दिनानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी संविधान वाचन तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतीय संविधान दिनानिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, नायब तहसीलदार संतोष बोथीकर, गोळेगावकर यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जे एस भट्ट, पर्यवेक्षक टी आर चिलमुल, एन टी सोळंके, शाम जाधव, एस के जोंधळे, टी एस खिल्लारे, गजानन बांगर, पी के राऊत आदींची उपस्थिती होती. येथील जिल्हा परिषदेतही संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह अधिकारी, विभागप्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले

# हिंगोलीत नगर परिषदेच्या कामांची त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

येथील नगर परिषदेच्यावतीने शहरातील जलेश्वर तलाव परिसरात रस्ते प्रकल्पअंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांची तपासणी मंगळवार दि २६ नोव्हेंबर रोजी श्री गुरू गोविंदसिंग शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात आली. यावेळी या पथकाने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन तांत्रिकदृष्ट्या कामांची तपासणी केली. कामाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, नगर अभियंता प्रतीक नाईक, तपासणी पथकातील देशमुख, गाडेकर, भगत यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### संविधान दिनानिमित्त मोटारसायकल रॅली



हिंगोली- तालुक्यातील आडगाव लिंबाळा येथे २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधान गौरव दिन मोटरसायकलचे रॅली काढून लिंबाळा येथून या रॅलीची सुरुवात करण्यात आली. भिंगी आडगाव बेलोरा चिंचाळा आणि खंडाळा येथे उद्देशिकेचे वाचन करून वाचन करून संविधान गौरव दिन साजरा करण्यात आला मोटरसायकल रॅलीचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण यांनी केले होते. यावेळी चंद्रमणी हनवते, गोरख कांबळे, अजय कांबळे, विशाल कांबळे, तेजस हनवते, सुमेध हनवते अभी हनवते भूषण, हनवते संदीप ,हनवते प्रवीण हनवते, समीर घोंगडे, विलास इंगोले, उमेश हनवते, गणेश पानपटे, हनुमान हनवते, विजय कांबळे, प्रमोद कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले होते.

### संभल येथील गोळीबार प्रकरणाची चौकशी करा



हिंगोली- उत्तर प्रदेशातील संभल यैथील शाही जामा मस्जिद सर्वेखण संदर्भात मुस्लीम समजाच्या आंदोलनकर्त्यांवर गोळीबार करून ५ मुस्लीम युवकांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली असून या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशामार्फत चौकशी करून दोषी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खूनाचा गुन्हा दाखल करावा तसेच मयताच्या कुटुंबियांना प्रत्येक पन्नास लाख रूपयांची आर्थिक मदत द्यावी अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंचाच्यावतीने जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष शेख बासीत महेबूब, शेख आवेज, पठाण साजीद खान, शेख शाहनवाज, सतीश लोणकर, जावेद चाऊस आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीतील जीएसटी अधीक्षकाला लाच घेतांना रंगेहाथ पकडले

## नोंदणी रद्द करण्यासाठी प्रस्ताव सादर न करण्याचा मागितला मोबदला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील एका कंपनीची नोंदणी रद्द करण्यासाठी प्रस्ताव सादर केला नसल्याचा मोबदला म्हणून १० हजाराची लाच घेणाऱ्या केंद्रीय वस्तू व सेवा कर कार्यालयाच्या अधीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार यांचा केळीचे चिप्स बनवून विक्री करण्याचा व्यवसाय असून त्यांचे नावे कुरुंदकर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या नावाने नोंदणीकृत कंपनी असून सदर व्यवसायासाठी जीएसटी रजिस्ट्रेशन क्रमांक तक्रारदार यांनी घेतलेला आहे.

तक्रारदार यांनी मागील सहा महिन्यापासून कंपनीचे जीएसटी रिटर्न दाखल न केल्यामुळे दिनांक ०७ आक्टोबर रोजी त्यांचे कंपनीचे मेलवर जीएसटी कार्यालयाकडून सिस्टीम जनरेटर नोटीस प्राप्त झाली होती.०४ नोव्हेंबर रोजी हजर राहणेबाबत कळविले होते.

त्यानंतर दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सी जी एस टी हिंगोली कार्यालयातील, अधीक्षक मनोज मगरे यांनी तक्रारदार यांना फोनद्वारे कळविले की, तुमच्या कंपनीचे जीएसटी रिटर्न दाखल केले नसल्याने कंपनीचे जीएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यात येणार आहे, रजिस्ट्रेशन कॅन्सल करावयाचे नसेल तर हिंगोली येथे जीएसटी कार्यालयात येऊन भेटा, असे सांगितले. त्यावरून तक्रारदार यांनी ऑनलाइन पद्धतीने कंपनीचे जीएसटी रिटर्न भरून त्यावरील दंडाची रक्कम देखील भरून घेतली. त्यानंतर तक्रारदार यांचे कंपनीचे मेलवर जीएसटी कार्यालयाकडून जीएसटी रिटर्न भरल्या बाबत व दिनांक ०७ नोव्हेंबर रोजीची नोटीस कॅन्सल केले बाबत दि.०८ नोव्हेंबर रोजी जीएसटी कार्यालयाकडून सिस्टीम जनरेटेड ऑर्डर प्राप्त झाली. त्यामुळे तक्रारदार जीएसटी कार्यालय हिंगोली येथे मनोज मगरे यांना भेटण्यासाठी गेले नाही.

दि.२२/११/२०२४ रोजी जीएसटी कार्यालय हिंगोली येथील अधिकारी मनोज मगरे यांनी फोन द्वारे तक्रारदार यांना कळविले की तुम्ही मला भेटायला हिंगोली येथे या नाहीतर मी तुमच्या कंपनीचे जीएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी वरिष्ठांकडे पाठवतो पाठवतो असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे १०,००० रुपयाची मागणी केली. तक्रारदार यांना सदरची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २२/ ११/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे रीतसर तक्रार दिल्यावरून सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय पंचा समक्ष पडताळणी केली असता, तक्रारदार यांनी कंपनीचे जीएसटी रिटर्न भरलेले असताना व कंपनीचे जीएसटी रिटर्न न भरले बाबतची तक्रारदार यांना दिनांक ०७/१०/२४ रोजीची प्राप्त नोटीस कॅन्सल झालेले असताना मनोज मगरे यांनी तक्रारदार यांच्या कंपनीचे जीएसटी रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यासाठी वरिष्ठांकडे पाठविले नाही याचा मोबदला म्हणून १०,००० रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम १०००० रुपये स्वतः स्वीकारले असून त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

सदरील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक विनायक जाधव, पोलिस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, उपनिरीक्षक महमद युनुस, विजय शुक्ला जमादार तान्हाजी मुंढे, रवींद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलीक, गोविंद शिंदे, गजानन पवार, राजाराम फुफाटे, महिला पोलिस कर्मचारी योगीता अवचार, चालक शिवाजी वाघ यांच्या पथकाने केली आहे.

# २६/११ हल्ल्यातील शहीदांना श्रध्दांजली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व जवानांना तसेच निष्पाप नागरिकांना येथील गांधी चौकात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शहीदांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शांताबाई मोरे, गयाबाई कोरडे, सुनील काळे, गणेश साहू, नंदकिशोर बियाणी, रामराव ढोकले, प्रभाकर घोंगडे, प्रकाश निना, अरूण निलावार, अशोक मोरे, दिलीप वानखेडे, प्रकाश बोरकर, एकनाथ माने, शामराव मांदळे आदींची उपस्थिती होती.

# एनसीसी दिनी रक्तदान शिबीराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ नोव्हेंबर**

येथील आदर्श महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने ७६ वा एनसीसी दिन महाविद्यालयाच्या मैदानात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव, एनसीसी अधिकारी मेजर पंढरीनाथ घुगे, डॉ. सोपानदेव खरात राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

या दिनाच्या औचित्य साधून राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने शिरोमोनियल ड्रिल चे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्यांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक राष्ट्रीय कामात हातभार लावून या उपक्रमातून नेतृत्वाचे गुण विकसित केलेले आहेत असे मनोगत व्यक्त करीत एनसीसी दिनाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी आज राष्ट्रीय जबाबदारीतून रक्तदान करीत आहेत हे कार्य प्रत्येक युवकांसाठी प्रेरणादायी असेल असे मनोगत व्यक्त केले.

एनसीसी विभागाच्यावतीने सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीतून विद्यार्थ्यांने शासकीय रक्तपेढी येथे जाऊन रक्तदान केले. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान या यानुसार सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य एनसीसी विभागाच्या वतीने करण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये कृष्णा साबळे, आदिनाथ गाडगीळ, पल्लवी फड, प्रेरणा जावळे, ओमकार एकर, ओंकार शिंदे, वैभव पातळे, चंद्रकांत पठाडे, पल्लवी फड, निकीता जावळे, स्वाती भालेराव, वैष्णवी गुंजकर, वैष्णवी दवणे, प्रतीक्षा बांगर, मनीषा दहातोंडे, विशाखा पंडित, निकीता बोरकर, अनुष्का लाड, राजनंदनी सोनाले, सुप्रिया धुळे या छात्र सैनिकांनी सामाजिक कामात सहभाग नोंदविला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विकासाची कामे,जेजुरीचा खंडोबा राजेश पवारांच्या नवसाला पावला

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २६ नोव्हेंबर**

नायगांव मतदारसंघांतील झालेल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकी मध्ये विद्यमान आमदार राजेश पवारांनी मतदार संघातील भाजपा स्वगृहातील दिग्गजांचा विरोधाला न जुमानता राज्यात महायुतीने लाडकी बहिण या सारख्या महत्त्वाच्यायोजनेची मतदारसंघात महत्त्व पटवून देत. आपण

केलेल्या विकास कामाच्या बळावर व मतदार संघातील विविध जाती-धर्मातील लहान थोरांना मतदारांना राज्यातील तीर्थस्थळाचे घडवून आणलेल्या दर्शनाच्या बळावर मतदार संघातील मतदारांची विश्वासार्हता मिळवित प्रतिस्पर्धी डॉ. मिनल खतगांवकरा बरोबर एकाकी झुंज देऊन मतदारसंघ काबीज केल्याने समर्थकांनी फटाके वाजवून जल्लोष केला

नायगांव मतदार संघातील वाडी तांड्यावरील सामान्य नागरिक आरोग्याविषयक व भौतिक सुविधेपासून गेल्या अनेक वर्षापासून वंचित होता .तर काही गावांतील नागरिक हे रस्ते वीज पाणी यासारखे अनेक प्रलंबित प्रश्न मागील





पाचवर्षांत मतदारसंघातील मुगांव,उमरी,धर्माबाद भागातील वाडी तांड्या वर ना खाऊंगा न खांने दूंगा वाक्याप्रमाणे अतिशय पारदर्शकपणे विकास कामे केली या उपर ही. विद्यमान पवारांनी भाजपाची विचारधारा अंगीकृत करून मतदारसंघातील विविध जाती-धर्मातील लहान थोर मंडळी नां नागपूर येथील दीक्षाभूमी खंडोबाची जेजुरी ते काशी या सारख्या पवित्र तीर्थस्थळांचे दर्शन घडून आणले आहे.तर दुसरीकडे भाजपाची विचारधारा अंगीकृत करून व राज्यात महायुतीने राबविण्यात आलेल्या'लाडकी बहीण' या योजने बाबत मतदार संघातील बहिणीसाठी विद्यमान आमदारांनी मतदार संघातील बँक व्यवस्थापक अधिकार्याशी संवाद साधून योजनेचा लाभ मिळावा यासाठी देखील सातत्याने प्रयत्न केला.यासारखे विकासाची कामे करुन ही स्वगृही पक्षातील मतदार संघातील दिग्गजांचा ऐन निवडणुकीच्या तोंडावर विरोधाचा सामना करीत विद्यमान आमदारांनी भाजपाचे तिकीट मिळवून.मागील पाच वर्षात मतदार संघातील सार्वजनिक धार्मिक क्षेत्रामध्ये दिलेले योगदान केलेले विकास कामाचे मुद्दे घेऊन मतदार संघाची निवडणू क ही पती-पत्नी मिळून प्रतिस्पर्धी काँग्रेस पक्षाच्या डॉ. मिलन ताई निरंजन खतगांवकर तर वंचित बहुजन आघाडी चे डॉ. माधवराव विभुते या सह भाजपातील दिग्गजांच्या विरोधका बरोबरच प्रतिस्पर्ध्यांचा सामना करीत.आ. राजेश पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी माजी जि प सदस्या सौ पुनम पवार या दोघांनी मिळून मतदार संघातील वाडी तांड्यावर पाच वर्षांत केलेल्या विकासाचा महायुतीच्या काळातील लाडकी बहिण यासारख्या योजनेच्या कार्यकाळात दिलेल योगदान या सर्व कार्याचा लेखाजोखा हा प्रचाराचा मुद्दा करीत प्रतिस्पर्धी डॉ मिनल खतगांवकरासह वंचित बहुजन आघाडीचे डॉ माधव विभुते सह ईतर ही उमेदवार बरोबर एकाकी झुंज देत मतदार संघातील भाजपा पक्षाचे निष्ठावंत म्हणून घेणाऱ्यांना विरोधकांची बोलती बंद करीत प्रति स्पर्ध्या विरोधात १,२७८२८ मते घेऊन विजय संपादित केले .प्रतिस्पर्धी डॉ.मीनल खतगांवकरानी मतदारसंघातील मतदारांना विकासाचे आश्वासने देत फक्त ८०,७१३ एवढी मते मिळवले असून यावेळी डॉ. मीनल ताई खत गांवकरांचा विद्यमान राजेश पवारांनी ४७६९५ मतांनी दणदणीत पराभव केला आहे.

यावेळी नायगाव तालुक्यातील मतदारसंघातील नरसी चौकात पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड,हुस्सा येथील व्यवसायिक तथा भाजपाचे कट्टर समर्थक राजेश हंबर्डेसह पवारांच्या कट्टर समर्थकांनी वाडी तांड्यावर देखील गुलाल व बेल भंडारा उधळत फटाके फोडून जल्लोष केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### कर्मचाऱ्यांनी हरवलेला मोबाईल केला परत

**बिलोली**-दि. १८ नोव्हेंबर रोजी देगलूर ते बिलोली प्रवास करत असताना vivo 15 pro या कंपनीचा मोबाईल गहाळ झाला. बस क्रं. १७७५ बिलोली आगारात येत असताना कर्मचाऱ्यांला तो मोबाईल आढळून आला असता त्यांनी त्वरीत सुरक्षकाच्या मदतीने मोबाईल मालकाशी संपर्क साधला व मोबाईल परत केला. यावेळी बिलोली आगार, ता. बिलोली जि. नांदेड येथील चालक बि.एम. सोनकांबळे, सुरक्षारक्षक एम.जी.तरटे व वाहतुक नियंत्रक ए.एच.जाधव यांचे सर्वत्र कौतुक कण्यात आले.

### युवा महोत्सवाच्या तारखेत बदल

**नांदेड**-जल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २७ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बास्केटबॉल मैदान नांदेड, कुसुम सभागृह नांदेड व डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम व श्री. गुरुगोबिंदसिंघजी स्टेडियम नांदेड या विविध ठिकाणी करण्यात आले होते. नांदेड जिल्ह्यात राज्यस्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतीना सहभागी होता यावे व त्यांना सरावासाठी पुरेसा वेळ मिळावा या हेतुने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन १ व २ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्त जास्त युवक-युवतीनी मोठया संख्येने सहभागी होता यावे, यामध्ये कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महिला मंडळ, महिला बचतगट, युवकांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, नेहरु युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) इत्यादी संस्थेतील १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभाग घेऊ शकतात. त्यांचे वय दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजीची परिगणना करण्यात येईल. युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विजयी युवकांना विभागस्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचा मान मिळणार आहे.

# संविधानाची मूल्ये रुजविणे आपले प्रथम कर्तव्य असावे : पो.नि. सप्रे

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २६ नोव्हेंबर**

संविधानाने देशाला सदृढ लोकशाही दिली असून संविधान दिन हा स्वातंत्र्य भारतासाठी अत्यंत मोलाचा आहे. मानावाधिकारासह राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक सलोखा जपण्यासाठी सर्वांनी नेहमी पुढाकार घेणे गरजेचे आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाच्या मूलभूत अधिकारांकरिता देशाला ऐतिहासिक असा पायाभूत कायदा दिला आहे. संविधानाची मूल्ये रुजविणे आपले प्रथम कर्तव्य असावे, त्यामुळेच या दिनाचा उद्देश्य साध्य होईल असे प्रतिपादन येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी संविधान दिनानिमित्त येथील शासकीय विश्रामगृहामध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना केले.

यावेळी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. दरम्यान, मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या भ्याड हल्ल्यातील



हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रारंभी, पत्रकार संजय कोलते यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले तर सर्व उपस्थितांकडून शपथ घेण्यात आली. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के ,माजी नगरसेवक कैलास गोडसे ,माधव पाटील कदम ,संजय आऊलवर, अजगर हुसेन, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सूर्यकांतराव चौदंते यांनी संविधान दिनाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक बी. आर. कांबळे, पो. हे.कॉ.दिलीप चक्रधर,पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते,कुणाल चौधरी,पत्रकार ईश्वर पिन्नलवार,गंगाधर डांगे, साहेबराव गागलवाड,धम्मदाता कांबळे,अब्दुल रजाक, शेख जब्बार,अतीक अहेमद, साहेबराव हौसरे, नामदेव बिचेवार ,अमोल टेकले ,हाफिस कुरेशी ,माधव गायकवाड, सुभाष चौदंते,अविनाश चौदंते,

माजी नगरसेवक चांदु बोकेफोड अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण, संजय उर्फ पप्पू सोनटक्के, सचिन चंद्रे महावितरण चे यंत्रचालक जनार्दन लेंडेवाड, मेंडका येथील माजी सरपंच लक्ष्मणराव ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते मुजीब पठाण, राजरत्न क्षीरसागर, अशोक पाटील मुंगल इजळीकर, आदित्य कोलते, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन पत्रकार संघाचे माजी जिल्हा सहसचिव संजय कोलते यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते यांनी मानले.

# आनंद पाटील बोंढारकर यांचा अटीतटीच्या लढतीत मोठा विजय

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

नांदेड दक्षिण मतदार संघात महायुती व महाविकास आघाडी यांच्या अटीतटीच्या लढतीत महाविकास आघाडीच्या उमेदवार यांच्यावर विजय मिळवून दक्षिण मतदार संघ हे शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करून दाखवत महायुती शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दणदणीत विजय मिळवला या विजयाचे शिलेदार माजी खासदार हेमंत पाटील आहेत. त्यांच्या विजयाचा जल्लोष संपूर्ण मतदारसंघात त्यांच्या



चाहत्या कार्यकर्ते व मतदार यांच्या कडुन होत आहे.

**माजी खा.हेमंत पाटील बनले विजयाचे शिलेदार**

नांदेड विधानसभा निवडणुका २०२४ घेण्यात आलेल्या निवडणुकांचा निकाल नुकताच लागला असून या निवडणुका नुसार महाराष्ट्र राज्यसह नांदेड जिल्हा येथील प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचा सुपडा-साप करत महायुतीच्या उमेदवारांनी महाविजय मिळवत एक हाती सत्ता आणली आहे. नांदेड जिल्ह्यातील नऊ आमदारांपैकी नऊ ही आमदार महायुतीने काबीज केले आहेत. यामध्ये नांदेड दक्षिण मतदार संघा तील महायुती शिवसेना शिंदे गटाचे विजयी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी अटीतटीच्या लढतीत विजयी बाजी मारली या त्यांच्या विजयाचे शिलेदार माजी खासदार हेमंत पाटील हे असल्याची चर्चा संपूर्ण मतदारसंघा चालू आहे आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या विजयाचा जल्लोष मतदारसंघात ठिकठिकाणी करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# अटीतटी नाहीच! तब्बल ३० हजारची आघाडी घेत कोहळीकर यांचा दणदणीत विजय

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २६ नोव्हेंबर**

अत्यंत चुरशीची व अटीतटीची ८४- हदगाव - हिमायतनगर विधानसभा निवडणूक होणार अशी संबंध तालुक्यात चर्चा होत असताना प्रत्यक्ष निकालाच्या दिवशी सगळेच अंदाज फोल ठरवत महायुतीचे अधिकृत उमेदवार संभाराव उर्फ बाबुराव कदम कोहळीकर यांनी अगदी निकालाच्या दिवशी अगदी पहिल्या फेरीपासून विजयाची आघाडी घेत शेवटच्या फेरीपर्यंत कायम ठेवत तब्बल ३०००० चे मताधिक्य घेत महाविकास आघाडीचे उमेदवार माधव पवार जवळगावकर यांचा पराभव करत विजय खेचून आणला.

दि.२३ नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या




निकालावरून जनतेने एक प्रकारे स्पष्ट संदेश दिला की, आता घराणेशाहीला हदगाव-हिमायतनगर तालुक्यात जागा नाही तसेच घराणे शाहीवर जनता ही मोठ्या प्रमाणावर कंटाळली होती. अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून व राजकीय संघर्षातून आपली राजकीय जिवनाची सुरुवात करणारे शांत, संयमी वृत्तीमुळे अख्ख्या दोन्ही तालुक्यात ओळखणारे बाबुराव कदम कोहळीकर यांनी सर्वांचे अंदाज चुकवीत आमदारकीची माळ आपल्या गळ्यात जनतेच्या सहकार्यातून घातली. लाडकी बहीण योजना, महायुती सरकारचे विकासाभिमुख राजकारण विविध योजना या सर्वांच्या नागरिकांवर चांगलाच प्रभाव पडल्याचे निकालांती दिसून येते. विजयानंतर दोन्ही तालुक्यात महायुतीच्या घटक पक्षांचा कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष मोठ्या उत्साहाने साजरा केला. यावेळी जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, माजी खा. सुभाषराव वानखेडे, गंगाधर पा. चाभरेकर, बबन कदम, मंचकराव कदम, बाबूसराव कदम, संभाजी लांडगे, अतुल राउतराव यांच्यासह महायुतीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालकमंत्री म्हणून चिखलीकरांची नियुक्ती करण्याची यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील सर्वात अनुभवी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची संपूर्ण जिल्ह्याची सखोल माहिती व अचूक ज्ञान असलेला नेता म्हणून जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड करावी अशी मागणी स्वप्निल इंगळे पाटील यांनी मा. अजितदादा पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री हा जिल्हा प्रशासन व राज्य सरकार मधील एक महत्वाचा दुवा म्हणून काम करतात कारण पालकांप्रमाणे ते जिल्ह्याला काय हवे नको ते बघत असतात. जिल्हा प्रशासनला ते मार्गदर्शन करतात. राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या योजनांची प्रशासनामार्फत अमलबजावणी ते करतात. ते जिल्हा नियोजन समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ते जिल्ह्याचे प्रश्न मार्गी लावतात



याबरोबरच पालकमंत्री जिल्ह्यातील विविध राज्य सरकारच्या योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतात आणि जिल्ह्याचे प्रशासन कार्यक्षमतेने कार्यरत असल्याची खात्री करतात त्यामुळे प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासारखा अनुभवी नेता व संपूर्ण जिल्हा तसेच शहराची खडाण खडा माहिती असलेला लोकप्रतिनिधी सध्या आमदारांमध्ये नाही त्यामुळे प्रतापराव पाटील चिखलीकरच हे पालकमंत्री पदाचे दावेदार आहेत असेही स्वप्निल इंगळे यांनी म्हटले आहे.

# शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्यावतीने लाडक्या बहिणींचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

राज्यामध्ये महायुतीला आलेल्या यशाबद्दल तसेच शिवसेना पक्षाचे नवनिर्वाचित आमदार निवडून आल्याबद्दल शिवसेना राज्य ग्रंथालय सेल महाराष्ट्रप्रदेश आणि इंदिरा सार्वजनिक वाचनालय पौणिमानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आ. आनंदराव तिडके बोंढारकर यांना मुख्यमंत्री लाडक्या बहिणींना प्रचंड बहुमताने निवडून दिल्याबद्दल लाडक्या बहिणींचा सत्कार सोहळा दि. २५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न



झाला.

या आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ, ज्योतीताई देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आनंदराव बोंढारकर यांच्या सुविद्य पत्नी सरस्वती बोंढारकर, शिवसेना राज्य ग्रंथालय सेलचे राज्यध्यक्ष बी.जी. देशमुख, माजी जि.प. सदस्य शिवाजीराव कदम, मुक्ताई तिडके, वर्षा खराणे, अनुसया मुगल, राऊत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेल्या सर्व लाडक्या बहिणींचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य ग्रंथालय सेलचे शहराध्यक्ष संजय सूरनर, माधव कदम, राजेश मोरे, रमेश कांबळे, दिनेश लाकशटवार, प्रदीप भंडारी, रवी वाघमारे, गजानन देवसरकर, शिवाजी मुंडे, विश्वनाथ राऊत, .एल.आर इंगोले, सविता राऊत, मीनाताई अंबोरे, दुर्गाताई राऊत, छाया जोंधळे, संगीता रेखावार, मीणा राऊत यांच्यासह आदी जणांची उपस्थिती होती.

# भोकरचा भक्कमपणे विकास होणार : खा.अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २६ नोव्हेंबर**

सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली, खंबीरपणे पाठीमागे उभा राहिलात, आज सर्वांचे आभार मानण्यासाठी मी येथे आलो असून भोकरच्या विकासाला आता केंद्रातील सरकार आणि राज्यातील महायुती सरकारची साथ मिळणार असल्याने भोकरचा भक्कमपणे विकास होईल असा विश्वास माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी भोकर येथील आभार सभेत बोलताना व्यक्त केला.

भोकर विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार ॲड.श्रीजयाताई चव्हाण ह्या एक लाख ३३ हजार १८७ मते घेऊन ५० हजार मतांची आघाडी घेऊन विजयी झाल्याने भोकर येथे दि.२४ रोजी गणराज मंगल कार्यालयात आभार सभा आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी नवनिर्वाचित आमदार श्रीजयाताई चव्हाण यांचा भाजपा युवा मोर्चा, रिपाई गट, राष्ट्रवादी काँग्रेस, प्रत्येक गावाच्या ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले या आभार सभेत पुढे बोलताना माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण म्हणाले तेलंगानातील काँग्रेस नेत्यांनी भोकर मध्ये येऊन लुडबुड केली लाडक्या बहिणींची साथ मोठ्या प्रमाणावर मिळाली लोकशाही मजबूत करायची आहे नव्याने विकासाच्या कामाला लागायचं असल्याचे खा. अशोक चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमास माजी आमदार अमर राजूरकर, नरेंद्र चव्हाण, मंगाराणी आंबुलगेकर, सभापती जगदीश भोशीकर, किशोर पाटील, भगवान दंडवे, राजेश अंगरवार, विनोद चिंचाळकर, राजेश देशमुख, विशाल माने, वेणू कोंडलवार, बाबुराव अंदबोरीकर, डॉ. बालाजी बिलरवार, सरपंच संघटना अध्यक्ष मारोती भोंबे, बालाजी शानमवाड, संजय बरकमकर, कल्पनाताई भोसले, मिर्झा ताहेर बेग, डॉ.फिरोज इनामदार आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# फडणवीस हे केराम यांना मंत्रिपद देऊन २५ वर्षांपासूनचा खाडा दूर करतील?

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.२६ नोव्हेंबर**

काँग्रेसचे स्व.उत्तमराव राठोड व भाजपाचे डी.बी.पाटील यांच्यानंतर जवळपास २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीपाआसून किनवट मतदारसंघास राज्याच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली नाही. हे पूर्वी निजामशाहीत तर आता मराठवाड्यातील आडवळणी पडलेल्या या दोन्ही तालुक्याचे फार मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. गेली पंचवीस वर्षे दिर्घकाळ पडलेला मंत्रीपदाचा खाडा नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना नवीन राज्य मंत्रिमंडळात संधी देऊन भाजपाचे पक्षश्रेष्ठी व उपमुख्यमंत्री तथा भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूर करतील का याकडे मतदारसंघातील तमाम भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व आ.केराम समर्थकांचे लक्ष लागले आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर हे दोन्ही तालुके मिळून किनवट विधानसभा मतदारसंघ म्हणून राज्यात किनवटची राजकीय ओळख तर आदिवासी बहुल मागासलेले तालुके अशी भौगोलिक दुर्दैवी ओळख पण, सुदैवाने यातील जमेची बाजू म्हणजे माहूर हे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुकादेवीचे जागृत देवस्थान असलेले एक मूळ पीठ अशी देशात सर्वदूर भक्कम ओळख असूनही, विकासाच्या बाबतीत नकारात्मकता असल्याने ती दूर करण्यासाठी तर धार्मिकतेच्या बाबतीत सकारात्मकता असल्याने त्याच्या वाढीसाठी अशी दुहेरी गरज असतानाही स्व.उत्तमराव राठोड व डी.बी.पाटील यांच्यानंतर जवळपास २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीपाआसून किनवट मतदारसंघास राज्याच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली नाही. हे पूर्वी निजामशाहीत तर आता मराठवाड्यातील आडवळणी पडलेल्या या दोन्ही तालुक्याचे फार मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.



नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या तीनही मुख्य घटक पक्षाला राज्यात छप्परफाडके असे घवघवीत अभूतपूर्व यश मिळालेले आहे. एकिकडे २७ किंवा २८ तारखेला मुख्यमंत्री ठरुन नवीन मंत्रीमंडळाची स्थापना होण्याची शक्यता आहे. तर राज्यातील प्रमुख लढतींपैकी एक लक्षवेधी लढत ठरलेल्या किनवट विधानसभेत दुसऱ्यांदा निवडून आलेले महायुतीचे भाजपाचे नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना यावेळी तरी राज्यमंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री अथवा निदान राज्यमंत्री पद देऊन भाजपा पक्षश्रेष्ठी या आदिवासी ग्रामीण भागातील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करतील का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यासोबतच राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या माहूर तिर्थक्षेत्राचादेखील सर्वांगीण विकास करण्यासाठी आमदार भीमराव केराम यांना नामदार बनवून मंत्रीपद देऊन न्याय देतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तिर्थक्षेत्रासारख्या एका पवित्र भागावर भारतीय जनता पार्टीचे राज्यातील सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राजकीय दृष्ट्या या भागावर आपली पकड आणखी मजबूत करण्यासाठी महायुतीला मिळालेल्या या अभुतपूर्व यशातील आपल्या सिंहाच्या वाट्यातून केराम यांना खारीचा वाटा म्हणून आदिवासी विकास मंत्री अथवा , इतर एखाद्या खात्याचे मंत्री म्हणून संधी देतीलच अशी आशा बाळगून आहेत. महत्वाचे म्हणजे आ.केराम हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष निकटवर्तीय मानले जातात. केराम यांच्या प्रचारार्थ फडणवीस यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत किनवटची विशाल जनसमुदाय उसळलेली जाहीर सभा गाजवून एका दणक्यात केराम यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले होते. माहरची आई श्री रेणुकामाता ही उपमुख्यमंत्री फडणवीस यांची कुलस्वामिनी असून, मातेच्या दर्शनासाठी ते व त्यांच्या सौभाग्यवती याठिकाणी आवर्जून उपस्थिती लावत असतात. अशा या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रासह, आदिवासी बहुल किनवट तालुक्याचा मागील पंचवार्षिक कालावधीत करुन राहिलेला व आणखी भक्कम विकास करण्यासाठी, येथील आदिवासी समाजासोबतच अठरापगड जाती, जमाती व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी आ.केराम यांना मुंबईत राज्य मंत्रिमंडळात मंत्रीपद देऊन या मागासलेल्या भागांतील जनतेला न्याय देण्यात यावा अशी इच्छा येथील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक व सर्वसामान्य जनतेसह येथे येणाऱ्या लाखो भाविकांमधून व्यक्त केली जात आहे. गेली पंचवीस वर्षे दिर्घकाळ पडलेला मंत्रीपदाचा खाडा नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना नवीन राज्य मंत्रिमंडळात संधी देऊन भाजपाचे पक्षश्रेष्ठी व उपमुख्यमंत्री तथा भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूर करतील का याकडे मतदारसंघातील तमाम भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व आ.केराम समर्थकांचे लक्ष लागले आहे.

**जाहीर प्रगटन**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी हिमायतनगर यांच्या न्यायालयात**
**जन्म मृत्यू नोंदणी - सुधारला कायदा २०२३ मध्ये कलम ११ (३). अन्वये**
**अर्ज क्र २६७**

श्री/श्रीमती प्रल्हाद शिवराम आडगे रा. एकंबा ता. निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय एकंबा हिमायतनगर जि. नांदेड

विषयः- जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यूची नोंद घेण्याकरिता अदिशीत करणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार श्री / श्रीमती प्रल्हाद शिवराम आडगे एकंबा ता हिमायतनगर यांनी त्यांचे आई/वडील शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यू दिनांक २९ /१२/ २००९ मोजे मौ एकांबा यांना आदेशित करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

ज्या अर्थी शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालयास ता हिमायतनगर जी नांदेड येथे उपलब्ध नाही

ज्या अर्थी या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की अर्जदार यांची वडील/आई २९/१२/२००९ मृत्यूची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांक पासून ३० दिवसांमध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित मुदतीत हजर राहून अक्षय किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी हिमायतनगर**

पतसंस्थेच्या दुसऱ्या शाखेचे उदघाटन, जीवन गौरव, उद्योगरत्न, खेलरत्न व कण्व भूषण पुरस्कार प्रदान !

## कण्व ब्राह्मण समाजाचे स्नेहमीलन उत्साहात !

### मोठी स्वप्ने बघणारानी उद्योजक होण्यासाठी प्रयत्न करावेत : सारंग नितीन गडकरी

छत्रपती संभाजीनगर - कण्व ब्राह्मण समाजाचे दीपावली स्नेह्मिलन नागपूर येथील उद्योजक ✻श्री सारंग नितीन गडकरी व इतिहास संशोधक पार्थ बावस्कर✻ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे अध्यक्ष सीएस लक्ष्मीकांत जयपूरकर यांनी समाजाला एकत्र करणे व दिशा देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कण्व पतसंस्थेची दुसरी शाखा समर्थनगर येथे उघडण्यात आल्याचे सांगून या पतसंस्थेबरोबरच संस्थेच्या मंगल कार्यालय, अभ्यासिका, कण्व क्लिनिक, आरोग्य शिबिरे, दि १२ जानेवारीला आयोजीत राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.



यावेळी सारंग नितीन गडकरी यांनी संस्थेच्या सर्व उपक्रमाचे कौतुक करून आपल्या सर्वांगीण विकासासाठी उद्योजक किंवा व्यावसायिक व्हावे. उद्योजक होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न, चिकाटी व जीज्ञासुवृत्ती आपल्यात असावी यासाठी त्यांनी स्वतः ४ भागीदारीत सुरू केलेल्या पहिल्या उद्योगाचे उदाहरण दिले. त्याचप्रमाणे प्रत्येकाने आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातून १०% वेळ समाजासाठी देण्याचे आवाहन केले.

इतिहास संशोधक श्री पार्थ बावस्कर यांनी हिंदुत्व म्हणजे नेमके काय ? यावर बोलताना सध्याच्या बदललेल्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत हिंदुत्व जपण्याचे आवाहन केले. आज राम, कृष्ण व छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आपल्या मुलांना शिकवण्याची गरज असल्याचे सांगून पालकांनी जागरूक होण्याचे आवाहन केले. सध्या गैरसमजुतीमुळे विविध समाजात अविश्वास निर्माण झाला असून अशावेळी जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराजाच्या विचार आत्मसात करण्याचा सल्ला दिला. पालकांनी आपल्या मुलांना संस्कृती व विविध देवतांबद्दलच्या गोष्टी सांगून मुलामुलींना समृद्ध वारशाची जाणीव करून द्यावी असे सांगितले. ब्राह्मणातील बुध्दिमत्ता हेरून ब्राह्मणांना नोकरी करण्याची सवय ब्रिटिशांनी लावली. मात्र आता ब्राह्मणांनी नोकरी करणारा ऐवजी नोकरी देणारे होण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा उद्योगकेंद्राचे निवृत्त महाव्यपस्थापक पुरुषोत्तम भाले यांना कण्व जीवन गौरव, उद्योजक वालमी प्रॉडक्टसचे श्री धनंजय व्यंकटराव बडवे यांना उद्योगरत्न, राष्ट्रीय स्तरावरील कराटे चॅम्पियन सोहम राजेंद्र देशपांडे यास खेलरत्न व वेदमूर्ती सचिन सुरेशराव जोशी यांचा कण्व भूषण देऊन गौरव करण्यात आला. सन्मानमूर्तींना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सन्मान्पत्राचे वाचन कार्यक्रम प्रमुख उदय मानवतकर यांनी केले.

तसेच यावेळी समाजाचे मुखपत्र कण्व विकास च्या दिवाळी अंकांचे विमोचनही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ विजयालक्ष्मी भाले-कुलकर्णी व तुळशीदास जयपूरकर यांनी केले तर सचिव धीरज देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्याध्यक्ष अशोक भाले, कोषाध्यक्ष धनंजय सिमन्त, जनसंपर्क प्रमुख प्रफुल्ल कुलकर्णी, सौ संगीता कागबट्टे, सौ अलका भाले, सुरेंद्र आनंदगावकर, प्रवीण शिरोडकर, महेंद्र मानवतकर, भालचंद्र पिंपळवाडकर, अविनाश आडसकर, सौ ज्योती कुलकर्णी, सौ सविता आचार्य, सचिन दैठणकर व अनिल दिन्नापुरकर यांनी प्रयत्न केले.

## पैठणला आचारसंहितेमुळे खोळंबली कामे

तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- १५ ऑक्टोबर रोजी विधासभेसाठी निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने पैठण शहरासह तालुक्यात विकासकामे बंद झाली होती. यात प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकांसाठी खुले करण्यासाठी जायकवाडी पाटबंधारे विभागाला अडचण निर्माण झाली होती.आता २५ नोव्हेंबर रोजी आचारसंहिता संपुष्टात आल्याने रखडलेली कामे लवकर पूर्ण होणार या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

ऑक्टोबर १५ रोजी निवडणूक आयोगाकडून विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. महाराष्ट्रात एकाच टप्यात निवडणूक होत असल्याने मतदारसंघात १९ नोव्हेंबर रोजी मतदान झाले तर त्याचा निकाल ही २३ नोव्हेंबर रोजी घोषित करण्यात आला. आणि २५ नोव्हेंबर रोजी आचारसंहिता संपली. दीड महिन्यासाठी निवडणुकीची आदर्श आचारसंहित असल्याने. परिणामी विकासकामांची प्रक्रियाही थंडावली आहे.

विविध विकासकामांसाठी पैठण नगर परिषदेकडे कोटीचा निधी उपलब्ध झाला होता. या निधीतून पाणी पुरवठा योजना,विविध प्रभागात रस्ते निर्मिती ,शासकीय इमारत निर्मिती,नाला काँक्रिटीकरण,नवीन घरकुल कामे, पेव्हर ब्लॉक,ई टेंडरिंग, स्वच्छते विषयक आदी कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. मात्र, या विकासकामांची प्रक्रिया आचारसंहितेमुळे लांबणीवर पडली आहे.

याशिवाय शहरातील तसेच तालुक्यातील शासकीय तसेच प्रशासकीय निर्मितीच्या कामावरही आचारसंहितेमुळे परिणाम झाला आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, जिप, पंचायत समिती शिक्षण विभाग, ग्रामीण आरोग्य रुग्णालय विभाग,भूमिअभिलेख, कृषी कार्यालय, सार्वजनिक वनीकरण विभागाची कामे थांबल्यात जमा झाल्याने. त्यामुळे निधीच्या उपलब्धतेनंतरही ही कामे लांबणीवर गेली आहेत. आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेली आचारसंहिता मागे घेतल्याने थांबलेली कामे जलद गतीने पूर्ण होणार का.असा सवाल उपस्थित होत आहे.

## ऊसतोड कामगार महामंडळास प्रतिटन १० रु. प्रमाणे वर्गणी देण्याच्या निर्णयास खंडपीठात आव्हान

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : राज्यातील खासगी तसेच सहकारी साखर कारखान्यांनी ऊस गाळपाच्या प्रतिटन १० रुपयांप्रमाणे लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास वर्गणी देण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. कारखान्यांकडून वसूल झालेल्या निधीच्या प्रमाणात शासनाचा भाग महामंडळास अदा केला जाईल. या शासन निर्णयास औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे.

ऊस गाळपाच्या प्रतिटन १० रुपयांप्रमाणे साखर कारखान्यास वर्गणी अदा करण्याच्या तरतुदीविरोधात पूर्णा सहकारी साखर कारखाना तसेच भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांनी ड. शहाजी घाटोळ पाटील यांच्यामार्फत औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करून सदर शासन निर्णयास आव्हान दिले. याचिकेत केंद्र शासनामार्फत अन्न व नागरी पुरवठा विभाग, राज्य शासनामार्फत प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव सहकार, साखर आयुक्त, विभागीय साखर सहआयुक्त, साखर संघ तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस कामगार महामंडळ इत्यादींना प्रतिवादी केले आहे.

याचिकेत नमूद आहे की, साखर, इथेनॉल, प्रेसमड, को-जनरेशन इत्यादी साखर व साखरेच्या उपपदार्थांवर होणारा जीएसटी साखर कारखाने शासनास अदा करतात. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी अदा करत आहेत तसेच साखर संकुल देखभाल दुरुस्ती निधीपोटी प्रतिटन ०.५० रुपये अदा करतात. असे असताना प्रतिटन १० रुपये वर्गणी जाचक व अन्यायकारक आहे. त्यामुळे साखर कारखान्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

मिळणाऱ्या जीएसटी तसेच इतर निधीमधून शासन सदर महामंडळास आर्थिक मदत पुरवू शकते. परंतु, साखर कारखान्यांकडून त्यांच्या नफ्यातून प्रतिटन १० रुपये वर्गणी घेणे चुकीचे व गैरकायदेशीर तसेच कायद्याच्या व संविधानाच्या तरतुदीच्या विरोधात आहे. अगोदरच उसाच्या किफायतशीर व रास्त मूल्याची देयके अदा करणे साखर कारखान्यांना अवघड झाले आहे. सदर वर्गणी साखर कारखान्याच्या नफ्यातून देण्याचे शासन निर्णयाप्रमाणे आदेशित केले आहे. जर नफ्याची रक्कम वर्गणीत गेली तर निश्चितच सहकारी साखर कारखान्यांच्या सभासदांना लाभांश मिळणार नाही. त्यामुळे सभासदांचे अतोनात नुकसान होणार आहे.

## मॉन्टेसोरी बालक मंदिर, वाघमारे प्रशालेत संविधान दिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी मंगळवारी, २६ नोव्हेंबर २०२४ रोजी मॉन्टेसोरी बालक मंदिर प्राथमिक विभाग आणि आ. कृ. वाघमारे प्रशालेत विविध कार्यक्रमांनी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाची प्रस्तावना सामूहिक वाचन करून झाली. अश्विनी विरसणीकर यांनी प्रास्ताविकातून भारतीय संविधानाचे महत्त्व, त्याची रचना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान याबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रमुख अतिथी अजय तुपे यांनी आपल्या भाषणातून संविधानाच्या मूल्यांचा आदर आणि पालन करण्याची प्रेरणा दिली. प्रभारी मुख्याध्यापक किरण जाधव यांनी उपस्थितांना संविधान दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि अधिकारांची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. राजमाने यांनी आभार प्रदर्शन केले. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक देशमुख, संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमेश मालाणी, संस्थेचे सचिव गोविंद अग्रवाल आणि संस्थेचे मान्यवर डॉ. गिरीश सावजी, प्रफुल्ल मालाणी, निलेश महाजन, डॉ.श्रीकांत सावजी, संजय गादिया , सुवर्णा गिरमे, शशिकला बोराडे यांनी सर्व सहभागी विद्यार्थी पालकांसह अतिथी आणि आयोजन समितीचे आभार मानत संविधान दिन यशस्वीपणे साजरा केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व पटवून देणारा ठरला. यावेळी विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्का पाठक यांनी केले. याप्रसंगी श्री. चव्हाण , श्री. खेळवणे , श्री. शेख, श्रीमती गहेरवार, श्रीमती सुतवणे, श्रीमती भवर, श्रीमती वेदपाठक, श्री. घावटे, श्री. इखे, श्री. पवार, श्रीमती राजपूत, श्रीमती भातपुडे, यांनी विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदराची भावना निर्माण केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैभव वाघ, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रमपूर्वक सहकार्य केले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेना भवन येथे संविधान दिन साजरा

### २६ / ११ च्या घटनेतील शहिदांना वाहण्यात आली आदरांजली

सिल्लोड (प्रतिनिधी) : शहरातील ना. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यासोबतच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईतील अतिरेकी हल्ल्यात शहिद झालेल्या भारतमातेच्या सुपुत्रांस आदरांजली वाहण्यात आली. तालुका शिवसेना, युवासेनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणं यंदाही शहीद वीरांच्या स्मरणार्थ ना. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे श्रध्दांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात केले होते.

याप्रसंगी कृउबा समितीचे सभापती केशवराव तायडे, संचालक श्रीरंग साळवे, रमेश लाठी, माजी नगराध्यक्ष पांडुरंग दुधे, महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, विठ्ठल सपकाळ, मधुकर गवळी, राजू बन्सोड, प्रशांत क्षीरसागर, अशोक कांबळे, संजय आरके, जगदीश बेदवे, प्रभाकर पारधे, जितू आरके, संजय डमाळे, जगन्नाथ कुदळ, राजेश्वर आरके, संजय मुरकुटे, फहीम पठाण, भावराव दुधे, शेख शमीम, जीवनसिंग जाधव, संजय शिंदे, मनोहर आरके, रवी गायकवाड, संतोष खैरणार, रवि आरके, कृष्णा वाघ, दिलीप वाघ, राजू साठे, महेश पाटील, डॉ. प्रकाश बिरारे, रवी पवार , साहेबराव राकडे, रोहित माहेश्वरी , सय्यद रहीम आदींची उपस्थिती होती.

## पीएफ कार्यालयातर्फे आजपासून 'निधि आपके निकट' कार्यक्रम

### नियोक्ते, कर्मचारी, पेन्शनरनी लाभ घ्यावा

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनच्या वतीने बुधवार २७ नोव्हेंबर २०२४ रोजी विस्तारित आणि मजबूत आवृती 'निधी आपके निकट' छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील विविध ठिकाणी ईएसआयसीच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नियोक्ते, कर्मचारी, पेन्शनरनी लाभ घ्यावा, असे आवाहन भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

१. सदस्य सेवा वितरण आणि तक्रार निवारण, २. ईपीएफ आणि एमपी कायद्यावर लक्ष केंद्रित करून नवी समाविष्ट असलेल्या आस्थापनांसाठी अभिमुखता कार्यक्रम, नियोक्ता आणि कर्मचारी यांचे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, ३. नियोक्ते, मुख्य नियोक्ते, कंत्राटदारांसाठी ऑनलाइन सेवा, ४. कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाइन सेवा. ५. नवीन उपक्रम, सुधारणा, व्हिडीओ चित्रपट दाखवणे याबाबत जागृती कार्यक्रम, सोशल मीडिया हण्डल फॉलो करणे, ६. सूट दिलेल्या आस्थापनांशी संवाद. नोव्हेंबर २०२४ साठी, निधी आपके निकट २.० 'फसवणूक प्रतिबंध आणि पासबुक' या थीमवर आयोजित केले जाईल. १. जागरुकता आणि फसवणूक प्रतिबंध, २. दक्षता, जागरुकता, ३. ई-पासबुक २७ नोव्हेंबर २०२४ (सकाळी ९.०० ते संध्याकाळी ४.३० पर्यंत) स्थळाचा तपशील खालीसप्रमाणे आहे. १. छत्रपती संभाजीनगर : रिलायन्स मॉल गारखेडा, २. जालना : जालना महानगरपालिका सभागृह, ३. नांदेड : युनायटेड स्पिरिट्स लि, बाळापूर गाव, ४. बीड : दवाखाना आणि शाखा कार्यालय, ५. परभणी : नगर परिषद सभागृह, नगर परिषद कार्यालय पाथरी, परभणी. ६. हिंगोली : सुंदरलाल सावजी अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

त्यानुसार, नियोक्ते, कर्मचारी, निवृती वेतनधारक आणि त्यांच्या संघटनांनी त्यांच्या संबंधित जिल्ह्यातील 'निधी आपके निकट' कार्यक्रमाला उपरोक्त ठिकाणी ९.०० ते ०९.३० या वेळेत उपस्थित राहून आपली आणि आस्थापनांची नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे. सर्व अभ्यागतांना ईपीएफओद्वारे प्रशासित योजना, ईपीएफओद्वारे सुरु करण्यात आलेले नवीन उपक्रम आणि ज्यांच्या तक्रारींचा जलद निपटारा करण्यात सहाय्य तसेच त्यांच्या भूमिका आणि जबादाऱ्यांची माहिती घेण्यासाठी संबंधित जिल्ह्यांतील 'निधि आपके निकट' कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे कळविण्यात आले आहे.

## लासुर स्टेशन येथील अभियंत्यासह भागाठाण सब स्टेशन इंचार्ज यांचे दुर्लक्ष

### वीज पुरवणाऱ्या रोहित्राला तीन दिवसांपासून अर्थिंगसाठी पाणीच नाही

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२६ नोव्हेंबर : लासुर स्टेशन येथील सहाय्यक अभियंता व भागाठाण येथील सबस्टेशन इंचार्ज यांचे सावंगीला वीज पुरवठा करणाऱ्या सब स्टेशनवरती साफ दुर्लक्ष असल्याने महावितरणाच्या आगाठाण सब स्टेशनातील रोहित्राला अर्थिंगसाठी पाणी मिळत नाहीये. यामुळे सावंगी परिसरातील वीजपुरवठा वारंवार आणि तासनतास खंडित होत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे येथील ऑपरेटरनी दोन दिवसांपूर्वीच सब स्टेशन इंचार्ज व लासुर अभियंता यांना कळवले होते तरी देखील या दोघांनी त्याची तात्काळ दखल न घेतल्याचे समजते.

मागील चार दिवसापासून सावंगी व परिसरातील जवळ जवळ ३० तास टप्प्या टप्प्याने वीजपुरवठा एका दिवसात ८ ते १० तासासाठी खंडित केला गेला. वीज आली तरी पाहिजे त्या प्रमाणात वीज पुरवठा होत नसल्याने सावंगीकर त्रस्त झाले आहेत. ज्या आगाठण सब स्टेशन येथून सावंगी येथे वीज पुरवठा केला जातो तेथील रोहित्राला अंर्थींगसाठी पाणीच नसल्याचे समोर आले आहे.

याबाबत लास्ट स्टेशन येथील अभियंता, आगाठण येथील सबस्टेशन ऑपरेटर, व येथील सब स्टेशन इंचार्ज यांनी काय काय दखल घेतली हे विचारले असता ते म्हणाले सहाय्यक अभियंता शिवाजी गायकवाड यांना सब स्टेशन ला अर्थिंग साठी पाणी नाही तर हे काम कोण बघतं कोणी बघितलं पाहिजे तर त्यांनी असे सांगितले की तेथील इन्चार्जनी हे बघितलं पाहिजे आणि त्यांनी याबाबत कारवाई केली पाहिजे मग तुम्ही त्यांना बोललेत का यांनी उत्तर दिले मी त्यांना बोलू शकत नाही. मग तुम्हाला शेकडो ग्राहकांना वेठीस धरलेलं चालतं का? नाही मी स्वतः तिकडे दोन टँकर पाणी पाठवले आहे. असे उत्तर त्यांनी दिले

आगाठाण सबस्टेशन ऑपरेटर यांना सब स्टेशनच्या रोहित्राला पाणी नाही असे कळले तेव्हा तुम्ही कुणाला सांगितले असे विचारले असता. आम्ही इंचार्ज व आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवतो. त्यांना कळवले होते.काल रात्रीच पाणी आले आता वीज पुरवठा सुरळीत होईल असे तो म्हणाला.

## ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांचा सन्मान



छत्रपती संभाजीनगर : ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यानी २५ मे ते २३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत 'सॅटलाईट मेटिरॉलॉजी' या विषयाचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा आभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना प्रशिस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. डॉ. साबळे यांनी हा आभ्यासक्रम वयाच्या ७५ व्या वर्षी पूर्ण केला, हे विशेष. साऊथ असिया मेटिरॉलॉजीकल असोसिएशन (सामा) व डव्हान्स सेंटर फॉर टमॉस्पेरिक रिसर्च कोचीन, सायन्स एड टेकनॉलॉजीकल युनिव्हर्सिटी यांनी हा प्रशिक्षण कार्यक्रम संयुक्तपणे राबविला. त्यात ४७ देशातील १९० शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला. पावसाचे अचूक अंदाज देण्यासाठी डॉपलर रडार आभ्यासक्रमाचा उपयोग होणार असून, सध्या देशात ३७ ठिकाणी डॉपलर रडार आहेत. त्यात २०२५ सालात देशात मोठ्या प्रमाणात वाढ केली जाईल. पावसाचे अंदाज अचूक देण्यासाठी शास्त्रज्ञांची कार्यक्षमता वाढावी, त्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता.

## सशक्त, समृद्ध समाजाकरिता आरोग्यदायी जीवन महत्त्वाचे : डॉ. उपेंद्र अष्टपुत्रे

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

सशक्त आणि समृद्ध समाजाकरिता आरोग्यदायी जीवन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. उपेंद्र अष्टपुत्रे यांनी रविवारी, २४ रोजी येथे केले. सिडको एन-२ मधील ग्रामविकास संस्थेतर्फे ग्रामविकास भवनात आयोजित दीपावली फराळ कार्यक्रमात 'निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली' या विषयावर अष्टपुत्रे बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी सोमेश्वर आसावा (सी.ए.), संस्थेचे अध्यक्ष जयश्री हदगल, सचिव नरहरी शिवपुरे, संचालक प्रा. जयप्रकाश बागडे, अशोक गुरनाळे, पत्रकार संतोष मुंडे, उपप्राचार्य डॉ. टी. आर. पाटील, सिनेट सदस्य अरविंद केंद्रे, मनोहर सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**ग्रामविकास संस्थेच्या दीपावली फराळ कार्यक्रमप्रसंगी डॉ. टी. आर .पाटील, अशोक गुरनाळे, नरहरी शिवपुरे, जयश्री हदगल, डॉ. उपेंद्र अष्टपुत्रे, सोमेश्वर आसावा, प्रा. जयप्रकाश बागडे, शिवाजीराव घुगे, संतोष मुंडे, मनोहर सरोदे आदी.**

डॉ. अष्टपुत्रे म्हणाले, आरोग्यदायी जीवनासाठी दिनचर्या, आहार व व्यायाम या त्रिसूत्रीचा अवलंब करावा. आरोग्य हे डॉक्टरांच्या हाती नसून, तुमच्याच हाती आहे. मानसिक व सामाजिक स्वास्थ्य हेच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. आसावा म्हणाले, आयुष्यात प्रगती करावयाची असल्यास कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. आर्थिक समृद्धीसाठी सर्वांनी आर्थिक शिस्त पाळणे आवश्यक आहे. वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आसावा ब्रदर्सतर्फे यथायोग्य मदत करण्यात येईल.

प्रास्ताविकात संस्थेचे सचिव शिवपुरे म्हणाले, ग्रामविकास संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. संस्थेने आजतागायत मराठवाड्यातील १०० गावे दुष्काळमुक्त केलेली असून, विविध प्रकल्पांच्या माध्यमातून शाश्वत ग्रामविकासाची लोकचळवळ २,५०० गावापर्यंत पोहोचविण्यात संस्थेला यश मिळाले आहे. संस्था राष्ट्रीय व राज्य अशा अनेक पुरस्काराने सन्मानित असून, संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर समाजोपयोगी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

याप्रसंगी नामदेव कराड, नवनाथ बिराजदार, शिवाजीराव घुगे, दिगंबर निकाळजे, तुकाराम भुरे, ग्रामस्थ व महिला यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन अर्चना पवार यांनी, तर आभार रवींद्र वासनिक यांनी मानले .कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रवींद्र सात सातदिवे, निवृत्ती घोडके, राजेश्री बागडे, संदीप शिंदे यांनी परिश्रम घेतले

